विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १४२**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष दहावे/ अंक ७/ जून २००९

## संपादकीय


## बोधप्रद अहवाल

गेली १०-१५ वर्षे ख्रिस्ती धर्मगुरुंनी केलेल्या बलात्कार व बालकांच्या लैंगिक शोषणाचे अनेक अहवाल अमेरिकेपासून इंग्लंडपर्यंत प्रकाशित झाले आहेत. या अहवालांचे खरोखरच स्वागत व्हायला हवे. कारण या पंथामध्ये असे नराधम असतात याची जाणीव या अहवालांनी करून दिली. असे अनुभव येत असले तरी त्याची शास्त्रशुद्ध तपासणी, विश्लेषण व निष्कर्ष प्रभावीपणे मांडण्याची मानसिकता दाखवणे ही गोष्ट महत्त्वाची आहे.

ज्यांनी समाजाचे रक्षण करायचे, समाजाला मार्गदर्शन करायचे, आदर्श घालून द्यायचे त्यांनीच समाजाचे भक्षण करायला सुरुवात केली तर यातून सांस्कृतिक ऱ्हासापलिकडे काहीच होऊ शकत नाही. गेली काही शतके पाश्चात्य समाज, विज्ञान व तंत्रज्ञानात घोडदौड करत आहे. त्याची फळे म्हणून या देशांना आर्थिक सुबत्ताही मिळाली. रस्ते, पाणी, वीज यांची उपलब्धता व त्यांचे नियोजनही सुंदर झालेले दिसते. थोडक्यात भौतिक जीवनाच्या सर्व कक्षा आखीव, रेखीव, सुंदर झाल्या. तरी मानवी मूल्ये व संस्कृतीचा ऱ्हास झपाट्याने होताना दिसतो. सर्व प्रकारची गुन्हेगारी, व्यसनाधीनता, सर्व मानवी नात्यांना तिलांजली, पराकोटीची आत्मकेंद्रित वृत्ती व सर्वात भयावह म्हणजे समाजिक मूल्यांचे पोषण करणाऱ्या धर्मगुरुंचा झालेला ऱ्हास वर निर्देश केलेल्या अहवालातून दिसतो. म्हणूनच हे अहवाल बेचैन करणारे आहेत. या पार्श्वभूमीवर आपण दोन महत्त्वाचा गोष्टींचा ऊहापोह करू या.

माणसाच्या भौतिक व्यवहाराकरता मूलभूत सुविधा (जसे घर, पाणी, वीज, शिक्षण, रस्ते) व त्या सुविधांचा शिस्तबद्ध वापर जितका महत्त्वाचा असतो, तितकीच मानवी मूल्यांची संतुलित वाढही महत्त्वाची असते. आर्थिक समृद्धी माणसाला, समाजाला व राष्ट्राला एक प्रकारची सुरक्षिततेची व बेफिकीरीची भावना देते. यातूनच इतर समाजांकडे 'उपकार' करण्याच्या भावनेने बघितले जाते. यातून आत्मकेंद्रितपणा वाढत जातो. कला, साहित्य ही समाजावर संस्कार करणारी साधने आहेत. ही साधने चांगले संस्कार करू शकतात तसेच ती घातक संस्कारही घडवू शकतात.

(पृष्ठ क्रमांक ४० वर)



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दहावे / अंक ७ / जून २००९


**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १४ वे / अंक १२ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email: perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | ज्ञान आणि विज्ञान समन्वय - वेदान्त | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | शिनजँग वस्तुसंग्रहालय (Xinjiang Museum) | डॉ. सुधाकर आगरकर | ८ |
| ३) | भारतीय संस्कृती - बीज, मंडिल व साधना | श्री. यशवंत साने | ११ |
| ४) | पालकनीती | श्रीमती आशा भिडे | २२ |
| ५) | पूर्वजन्मातले संचित | श्री. यशवंत माने | २५ |
| ६) | व्यवस्थापन शास्त्रातील पाच 'स' कारांचे ग्रंथालयात उपयोजन | प्रा. श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये | २७ |
| ७) | साहित्य जगत | श्री. शरद जोशी | ३० |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# ज्ञान आणि विज्ञान समन्वय - वेदान्त

*धर्म आणि ज्ञान, विज्ञान, कला यांचे संबंध यावर पुरातन काळापासून माणूस विचार करतो आहे. वैदिक, पौर्वात्य दृष्टिकोन व पाश्चात्य दृष्टिकोन हे भिन्न आहेत. या लेखात या अनुषंगाने केलेले विचार मंथन आहे - संपादक*

**ज्ञान शाखा :**

मानव जिज्ञासू आहे. तो सतत आपल्या सभोवताली असलेल्या गोष्टींचा उलगडा करुन घेण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि आपले जीवन समृद्ध करण्याच्या उद्योगात असतो. त्याला बाह्य विश्वातील रहस्ये समजावून घ्यावीशी वाटतात. त्यातून आपला कोणता लाभ साधता येईल हा विचार प्रबळ असतो. या विचारातून भौतिक शास्त्राचा उगम झाला. याबद्दल मानव प्रयत्नशील असतो. तसेच स्वत:च्या ठिकाणी ज्या विविध शक्ती आहेत. विशेषत: मन, बुद्धि, इंद्रिये यांचा व या शक्तींच्या पलीकडे काय असू शकेल याचाही मागोवा घेताना आढळतो. या प्रयत्नांतून अध्यात्मशास्त्र जन्माला आले. थोडक्यात, मानवाला दृश्य विश्वाचे रहस्य व दृश्यापलीकडील विश्व समजा मानवाला हवी आहेत. धर्म वा अध्यात्म म्हणजे वस्तुनिष्ठता, भौतिकता, विज्ञान म्हणजे पदार्थ निष्ठता असे ढोबळ मानाने म्हणता येईल.

या विश्वातील लोकांना ज्यावेळी विश्व अनुभूतीची अंतदृष्टी जाणवू शकेल तेव्हा खऱ्या अर्थाने एकत्वाचा अनुभव ते घेऊ शकतील.

' हे विश्वचि माझे घर। ऐशी गति जयाचि स्थिर।

किंबहुना चराचर। आपण जाहला।'

हा जीवनातला अनुभव संतानी तसचे ऋषिमुनींनी घेतलेला आहे. भौतिक शास्त्रे संख्यात्मकतेचा विचार प्रधान मानतात तर आध्यात्मिक शास्त्र गुणात्मकतेवर भर देते. संख्यात्मक आणि गुणात्मक यांच्या संबंधीच्या मूलभूत गोष्टींचा विचार होणे अगत्याचे आहे. या दोनही शास्त्रांचा एकत्रित विचार कमी वेळा केला जातो. एकांगी विचारच केला जातो. विज्ञानाला गुरूत्वाकर्षणाच्या पलीकडची अवस्था अजमावयाचीच झाल्यास पदार्था पलीकडे जाणे आवश्यक आहे. म्हणजे दृश्य वस्तू बरोबर अदृश्याचाही विचार करावा लागेल. यासाठी विज्ञानाला मन, आत्मतत्व या गोष्टी स्वीकाराव्या लागतील. याने भौतिक शास्त्र उपयुक्त ठरुन मानवाच्या आकांक्षाचे पण समाधान होईल. सत्य जाणून घेण्याच्या प्रयत्नांत गतिमानता येईल.

**आजची स्थिती - धर्म विषयक :**

दुर्दैवाने धर्म आणि विज्ञान यांत उभा दावा निर्माण केला गेला आहे. सतराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत धर्म मानवाला जीवनमूल्ये देऊन त्याचे जीवन सुखी करत होता. ईश्वरविषयक नितांत श्रद्धा व त्याबद्दल निष्ठा धर्माने निर्माण केली. मानवाला नीतिनियमाचे काटेकोर पालन करावयास लावले. त्याच्यातून त्याचे चारित्र्य घडविले. जगातील सारेच धर्म आशिया खंडातच जन्माला आले. मात्र इतरत्र त्यांचा प्रसार झाला. हिंदु, बौद्ध, ख्रिस्ती, महंमदी आदि धर्मांचा उगम आशिया खंडातच आहे. हेच धर्म आज जगात मोठे प्रचलित धर्म आहेत. धर्माने मानवाला एक निश्चित तत्त्वज्ञान दिले. या सृष्टीचा आरंभ कसा झाला. त्याची धारणा, त्याचे स्वरूप, मानवाचे आणि विश्वाचे भवितव्य कुणावर अवलंबून आहे, या साऱ्या विषयी व्यवस्थित कल्पना दिली. मानवाने जगात वागावे कसे, याची पद्धत घालून दिली.

धर्माने घालून दिलेल्या पद्धती प्रमाणे आचरण करीत मानव सुखाने नांदत होता.

**विज्ञानविषयक :**

सतराव्या शतकानंतर हे चित्र पालटले. भौतिक शास्त्र वृद्धिंगत होऊ लागले. या शास्त्राने प्रथम युरोप खंड व्यापले. मग अमेरिकेत विज्ञानाचा शिरकावा झाला. आणि आशिया खंडात जोराने फोफावला. सांप्रत जग हे भौतिकशास्त्राने निर्माण केलेल्या गोष्टींच्या प्रभावाखाली वावरत आहे. बुद्धिवंतानी धर्माला केव्हाच सोडचिठ्ठी देऊन टाकली आणि भौतिक संपन्न गोष्टींत सुखाचा मार्ग शोधला. भारतापुरता विचार करावयाचे झाल्यास या देशात दोन प्रवाह स्पष्ट आढळतात. बुद्धिवंतांचा कल अर्वाचीन भौतिकशास्त्राकडे तर बहुजनसमाजाचा कल परंपरावादी धर्म कल्पनेकडे आहे. या देशातील बहुजन समाज आजही धर्म प्रेरणेने वागणारा आहे. बुद्धिजीवी अशी अत्यल्प मंडळी समाजाचे नेतृत्त्व करतात. परंतु ही मंडळी बहुजन समाजाला दैव देऊ शकत नाहीत. समाजात चैतन्य निर्माण होत नाही. बहुजनात असलेली प्राचीन धर्मश्रद्धा ईश्वरनिष्ठा आणि मूठभर बुद्धिवंतात आढळणारी या गोष्टी बद्दल बेपर्वाई व अश्रद्धा ही चिंतनीय बाब आहे. हे मूठभर लोक विज्ञानाचा वारा पिऊन चौफेर उधळत आहेत. त्यामुळे या दोहांत एकवाक्यता होणे कठीण झाले आहे. समाजात एकोप्याचा भाव निर्माण होणे अत्यावश्यक आहे.

**विज्ञानवादी धर्म विचार डावलतो :**

विज्ञानवाद्यांच्या मते १) विज्ञानाचे प्रयोग कोणालाही करता येतात व पडताळा घेता येतो. तसे धर्माचे नाही. पडताळा घेणे म्हणजे धर्माचे आचरण करणे ते अतीव कठीण. २) भौतिकशास्त्रे ही तर्काधिष्ठित आहेत. धर्म हा श्रद्धेचा विषय आहे. ३) भौतिकशास्त्रे ज्ञात गोष्टींचाच विचार करतात धर्म अज्ञात गोष्टींचाही विचार करतो. यामुळे भौतिकशास्त्रे ही अपरिहार्य आहेत. धर्माविचून मानवाचे जीवन कोणत्याही प्रकारे अडत नाही. या संबंधी विचार करणे आवश्यक आहे.

ही गोष्ट खरी की, विज्ञानाचे सर्वसामान्य प्रयोग एखाद्या प्रयोग शाळेत कोणीही करून पडताळा घेऊ शकतो. परंतु विज्ञानशास्त्रातील रहस्ये, सिद्धांत, निष्कर्ष हे सर्वांना क्वचितच तपासून पाहता येतात. उदाहरणार्थ - सापेक्षता वादाचा सिद्धांत - या सिद्धांताची तपासणी करण्यासाठी आईनस्टाईन व तुरळक वैज्ञानिक शांत सागरातील एका बेटावर सूर्यग्रहण समयी गेले. तिथे हा सिद्धांत तपासून त्या मंडळींनी सिद्धांत बरोबर असल्याची ग्वाही दिली. या सिद्धांत तपासणीवेळी अगदी मोजकी मंडळी होती आणि या मंडळींनी केलेल्या प्रयोगावर विश्वास ठेवण्यात आला. आणि इतर साऱ्या वैज्ञानिकांनी हे मान्य केले. कारण या साऱ्या शास्त्रज्ञांनी या प्रयोग करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवला आणि आज हा सिद्धांत शास्त्र सिद्ध असल्याचे मानण्यात येत आहे. एखादा संत वा एखादा ऋषी आपल्या अंतर्मनावर प्रयोग करून समाधी अवस्थेत - इंद्रियातीत अवस्थेत - प्रत्ययकारी अनुभव घेऊन तो सांगतो की विश्व एकाच तत्वाने व्याप्त आहे. असा अनुभव अनेकांतून एखादाच घेऊ शकतो. तरी देखील तो प्रामाणिक अनुभव असतो. अशा परिस्थितीत संतांच्या वा ऋषींच्या अनुभवाच्या प्रामाणिकतेबद्दल विश्वास का दाखवला जात नाही. त्याचा तो अंतर्विश्वातील प्रयोग खरा आहे असे का मानण्यात येत नाही. त्यांच्या प्रामाणिकतेवर विश्वास न ठेवल्यास शास्त्रज्ञांच्या प्रामाणिकतेविषयी विश्वास का ठेवावा हा प्रश्न उपस्थित होतो. एकाच्या प्रामाणिकतेवर विश्वास आणि सत्याचा धांडोळा घेणाऱ्या दुसऱ्या रीतीने प्रयोग सिद्ध सिद्धांताविषयी अविश्वास हे बुद्धिवंतांचे लक्षण असू शकत नाही. प्रामाणिकपणावर विश्वास ठेवावाच लागतो. धर्म असो विज्ञान असो दोन्हींचे आधार तर्क व विश्वास हेच आहेत. तर्क ही केवळ विज्ञानाची मक्तेदारी नाही अगर विश्वास ही केवळ धर्माची मक्तेदारी नाही.

---

*आईच्या प्रेमापेक्षा मोठे काहीच असत नाही.*

आज विज्ञानही केवळ दृश्य पदार्थांवरच आधारित नाही. आपण अणूच्या आतील भाग पाहू शकत नाही. चतुर्मिती काय आहे हे अंदाजानेच वर्तवावे लागते. गुरुत्वाकर्षणाचे नियम पाहता येत नाहीत. विश्वात ऐक्य आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न आज विज्ञान करीत आहे. जड व चेतन या दोन गोष्टी नसून चेतनच जडता धारण करते. आणि त्या उभयतांत अदलाबदल घडू शकतो हे आईनस्टाईन यांनी आपल्या सुप्रसिद्ध प्रमेयात व्यक्त केले आहे. ($E = MC^2$) अशा प्रकारे या दोनही ज्ञानशाखा दृश्य व अदृश्य या दोनही गोष्टींचा विचार करताना आढळतात. द्रष्टा आणि दृश्य या दोन गोष्टींपैकी धर्म द्रष्ट्यावर विशेष भर देतो तर विज्ञान दृश्यावर लक्ष केंद्रित करते. धर्म विश्वातील एकात्मभाव किती खोलवर रुजला आहे हे सांगतो. विज्ञान तो किती व्यापक आहे हे सांगते.

प्रचीन भारतात मानवाचे जीवन संपन्न आणि सुखावह असे होते. आजच्याइतका विज्ञानाचा प्रसार झाला नव्हता. त्या काळचे जीवन धर्म मर्यादित चालणारे आणि ईश्वरनिष्ठ होते. आजचे जीवन अनिश्वरवादी आणि धर्म प्रतिपादित मानवी जीवन मूल्यांना मूठमाती देणारे आहे. हा आधुनिक भौतिकतेचा काळ केवळ २००/३०० वर्षांचा आहे. या काळातच जीवनाची उबग येऊ लागली. याबद्दल पुनर्विचार होत आहे. आपल्या जीवनातील अनेक दु:खे धर्महीनतेमुळे निर्माण झालेली आहेत. विज्ञानाला अवास्तव महत्व देत असल्याने निर्माण झालेली आहेत याची जाण येत आहे. धर्म आणि विज्ञान यांतील हा फरक लक्षात घेतला जात आहे. ईश्वरनिष्ठा ही महत्त्वाची आहे. केवळ तंत्रात्मक व उपभोगात्मक जीवन हे अधुरे आहे. मात्र आपमतलबी आणि राजकारणी मंडळी वैज्ञानिकांना वेठीला धरून आपला स्वार्थ साधून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**संत आणि वैज्ञानिक :**

पदार्थ जसे दिसतात तसे ते नसतात असा सिद्धांत आहे. याविषयी संत आणि वैज्ञानिक या उभयतांचे एकमत असल्याचे आढळते. मात्र सामान्य माणसांना याचा उमज पडत नाही. वैज्ञानिक असो वा संत असो त्यांनी सामान्य माणसांना बरोबर घेऊनच गेले पाहिजे. धर्म व विज्ञान यांत परस्पर सामंजस्य असल्याचे आढळते.

विज्ञानामुळे भरपूर उत्पादन होते. परंतु हे उत्पादनच आजची डोके दुखी झालेली आहे. स्वार्थी लोकांना भरपूर उत्पादन हा शापच ठरतो. तर मग उत्पादन थांबवावे का? अगर जास्त उत्पादन झाल्यास त्या उत्पादनाचा नाश करावा उदा. गव्हाचे पीक भरघोस आले तर तो जास्तीचा गहू जाळून टाकावा अगर समुद्रात ओतावा. तसेच कापसाच्या गठड्यांना आगी लावून द्याव्यात. गहू कुणा भुके कंगालाच्या मुखात घालता येईल, कापसाचे वस्त्र बनवून लोकांची शरीरे झाकता येतील हे न करता या लोकांना तसेच भुके कंगाल व नंगे ठेवून उत्पादन झाले असतानाही कृत्रिम टंचाई निर्माण करण्याची वृत्ती बळावत असलेली आढळते. या उत्पादनाने आपला नफा बुडणार, हीच मतलबी लोकांची खरी खरी डोके दुखी असते.

याबाबत धर्माचा विचार महत्त्वाचा ठरतो. वितरणाचे चांगले मार्ग आहेत. त्यांचा अवलंब केल्यास जास्त उत्पादनाचे योग्य वितरण करून जगात सुख समाधान निश्चित प्राप्त करता येईल. इथे धर्माचा खरा प्रांत निर्माण होतो. सगळी मानव जात ही एकाच परमेश्वराची लेकरे म्हणून भांवडे आहेत. हे खऱ्या अर्थाने मानून एका जागी जास्त उत्पादन झाल्यास जिथे त्याची कमरता असेल तिथे ते देण्यात आले पाहिजे. परंतु, स्वार्थी वृत्तीमुळे असे घडत नाही. लोभीवृत्ती याच्या आड येते. विज्ञान जास्त उत्पादन करण्यासाठी मदत करील. वास्तविक या जादा उत्पादनामुळे मानव सुखी व्हावयास हवा. परंतु त्याचा स्वार्थ आडवा येत असल्याने वितरणाला मर्यादा पडतात. इथे विज्ञान काही करू शकत नाही. इथे धर्मबुद्धीच जागी करणे आवश्यक आहे. धर्म मानवातील दैवी प्रेरणेला आवाहन करतो व

संयमाने व्यवहार करावयास लावतो.

विज्ञानामुळे स्वरक्षण व राष्ट्ररक्षण करण्यास आत्यंतिक मदत होते. विज्ञानाने या संबंधी फार मोठी मजल मारलेली आहे. याबद्दल वादच नाही. धर्माची गोष्ट या हून वेगळी आहे. धर्म आपल्या शिकवणुकीने माणसा-माणसातील भेदाचे अंतरच कमी करू पाहतो. एकमेकाबद्दलची भीतीच नष्ट करतो आणि संरक्षणाची आवश्यकताच नाहीशी करतो अशा प्रकारे, विज्ञान व धर्म यात तफावत जरूर आहे. परंतु ती दोनही एकमेकां विरुद्ध मात्र नाहीत.

धर्म व विज्ञान ही उभयता शत्रू नाहीत. ती स्पर्धक जरूर आहेत. मात्र उभयतात शत्रुत्वाची भावना नाही. ही स्पर्धा उभयतांची बरोबरीने चालते. माणसातील अकर्मण्य आणि आलस्य घालविणे हेच उभयतांचे एकमेव श्रेष्ठ कार्य आहे. हे ओळखता आले पाहिजे. या दोनही ज्ञान शाखांचा योग्य रीतीनेअंगीकार करावा आणि आपले जीवन समृद्ध, संतुष्ट, समाधानी बनवावे. यासाठी आपणाला विज्ञान पचवावे लागेल.

आज आपल्या देशात अनेक बदल होत आहेत. अलीकडच्या शतकात प्रचंड प्रमाणात बदल घडून आले आहेत. मात्र या बदलांमागची प्रेरणा या देशाची नाही. हा बदल युरोपीय राष्ट्रांतून आलेल्या विचार सरणीप्रमाणे घडत आहे. त्यांच्या जीवनाचे अंधानुकरण चालू आहे. वास्तविक आम्ही ते केव्हाच पचवावयास हवे होते. परंतु आपण केवळ भारवाहकाचे काम पत्करले व त्यांचे ओझे पाठीवर वाहावयास लागलो. युरोपीय ज्ञान आणि अनुभव यामुळे या देशाची ताकद वाढलेली नाही. अगर प्रेरक ठरलेली नाही. कारण ही गोष्ट आम्हाला पचविता आली नाही. अद्याप त्यांचे विचार त्यांची पद्धत आमच्या दृष्टीने परकी व उसनीच आहे. रशिया, चीन, जपान या देशांनी हे विज्ञान आणि विचार पचविले. हे देखील आशिया खंडातीलच देश आहेत. हे पचविल्यामुळे आपली क्षमता व अस्मिता वाढवून आज जगात हे देश सामर्थ्य संपन्न म्हणून उभे ठाकले आहेत.

**युरोपीय राष्ट्रांतील विचारसरणी :**

चार शतकापूर्वी युरोप आपल्या विज्ञानाच्या सामर्थ्यावर अत्यंत डौलाने व प्रभावीपणे उभा होता. ह्या विज्ञानाने युरोपने जगण्या ऐवजी सर्व नाशाचे स्थानच निश्चित केले. त्यामुळे तो मागे वळून आशिया खंडाकडे पाहात आहे. त्याच्या कडून समतोल व खऱ्या समाधानी जीवनाचे धडे गिरवू पाहात आहे. आता यातून परतण्याचा एकमेव मार्ग उरलेला आहे तो म्हणजे वेदान्त मार्ग होय. वेदान्त एकात्म जीवनाचे दर्शन घडवितो आत्मा आणि विश्व, पदार्थ आणि मन, यांची सांगड घालतो. हा एकात्मभाव म्हणजेच ब्रह्मभाग. ब्रह्म म्हणजे उपाधिरहित वस्तुता. बाह्य जगातील पदार्थ आणि मन याचा विचार करताना हे सारे भासमान व मनोकल्पित आहे. वेदान्त धार्मिक जीवन व भौतिक ज्ञान यांच्या पलीकडे जाऊन विचार मांडतो. या देशात वेदान्तावर खूप विचार झालेला आहे. वेदान्त हे सर्व दर्शनांच्या परिपाकातून निर्माण झालेले नवनीत आहे.

**वेदान्त विचार :**

गायत्री मंत्राला तीन व्याहृती आहेत. भूः भुवः स्वः। भू म्हणजे पृथ्वीतत्व, त्यात पदार्थ आणि अवकाश या दोन गोष्टी संभवतात. भुवः म्हणजे मन आणि काळ यांनी युक्त असलेले विश्व, आणि हे विश्व 'भू' विश्वाशी सांधले गेले आहे. स्वः याला स्वर्ग म्हणतात हे व्यापक विश्व असून 'भू' विश्वाला व्यापून आहे. मानव, पदार्थ, अवकाश, मनवकाळ म्हणजे भूः भुवः या लोकाशी संबंधित. तसा तो राहून कार्यरत झाला तर दोन्ही लोक मिळून चतुःस्तरीय वा चतुर्मितीचा अनुभव घेऊ शकेल. आणि हे चतुर्मिती विश्व आत्मतत्वाने व्याप्त आहे. गायत्री मंत्रात आत्म्याचा विचार करताना तो आदित्यासारखा तेजस्वी तत् सवितुःवरेण्यः। तसेच दिव्य तेजाने युक्त भर्गः देवः आणि सर्व मानवाना

*दान, दया हे माणसातले दैवी गुण आहेत.*

बुद्धी प्रदान करणारा. धियः नः प्रचोदयात्। असा मांडला आहे. आत्मा हा मानवी बुद्धीच्या आणि विविधतेने नटलेल्या जगाच्या उंबरठ्यापाशी - म्हणजेच इतका जवळ आहे हेच जगाचे सत्यत्व.

**व्यष्टी आणि समष्टी :**

वैदिक तत्त्वज्ञान मानवाचे वैयक्तिक ध्येय अगर व्यक्तिमत्त्व तसेच वैश्विक जीवनमूल्ये आणि मानव्यता जोपसते. ध्येय अगर व्यक्तिमत्त्व जोपासनेतून मानव हा स्वतंत्र असल्याचे स्पष्ट होते. आणि जीवन मूल्यांच्या जोपासनेतून वैश्विकतेशी निगडित मानवाची कोणती कर्तव्ये आहेत, हा विचार स्पष्ट केला जातो. कारण याच्यातून मानव्यता उदयास येते या दोन्हीचा समन्वय हाच सर्व सामाजिक आणि नैतिकतेचा पाया होऊ शकतो. मनुष्य स्वतंत्र का आहे अथवा तसा तो आहे असे का मानले जाते. याचे कारण त्याच्यात आत्मतत्व आहे. आणि आत्मतत्व कुणावरही अवलंबून नसते. मानवाला वैश्विक स्तरावरील म्हणजे समष्टी जीवनासाठी कर्तव्ये का पार पाडावी लागतात. कारण वैश्विकताही त्या आत्मतत्वाचीच विस्तारित झालेली प्रतिकृती आहे. थोडक्यात विश्व म्हणजे आत्मतत्वाचाच पसारा. विश्व आणि मानवी जीवन या दोन्हीतून आत्मतत्व विस्तारित झाली आहे. म्हणून आत्म्याचे वर्णन करताना वेदात असे स्पष्ट म्हटले आहे की जो अणूहून अणू आणि महतहून महत आहे. अणोः अणीयान् महतो महीयान। आत्मा हा मंडलाकार आहे असे मानले जाते. मंडलाकार म्हणजे पूर्ण म्हणजेच शून्य. या शून्यलाच गणित व संख्या शास्त्रात अतीव महत्व प्राप्त झाले आहे. संख्येच्या पुढे शून्य आल्यास संख्या अनंत होते व संख्येचा पूर्वी भरीव आणि पोकळ शून्य आल्यास संख्या अत्यंत महान होते. (१, १०, १००, १००० इत्यादी) (१.१, .०१, .००१, .०००१ इत्यादी) ही किमया ब्रह्म या कल्पनेमुळे घडलेली आहे. व्यक्ती अनंत व सान्त दोन्ही आहे, हे या वरून ध्यानात येते. या दोन्ही गोष्टी लक्षात ठेवल्यास व्यष्टी आणि समष्टी जीवनात समन्वय निर्माण होईल. तरच जवित समृद्ध समाधानी व संतुष्ट होऊ शकेल.

**श्री. शं. बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४००६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

## निरीक्षणाचे महाजाल

इ. स. १८०४ साली लुईस व क्लार्क यांनी निरीक्षणात्मक पर्यावरणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यावेळी त्यांनी ३०० प्राणी व वनस्पती प्रजातींचे वर्णन केले होते. मिसुरी ते ओरेगॉन या पट्ट्यातील अभ्यासावर त्यांची निरीक्षणे आधारित होती. त्यानंतर चाळीस वर्षांनी थोरो यांनी वॉल्डन पॉंड येथे प्रथमच क्षेत्र गणना करण्याचे काम केले होते.

आता शास्त्रज्ञ, विद्यार्थी व इतर नागरिक करत असलेले क्षेत्रगणनेचे निरीक्षणांवर आधारित काम वेगळ्या वळणावर आले आहे. याचे कारण पर्यावरण तज्ज्ञांनी नॅशनल इकॉलॉजिकल ऑब्झर्व्हेटरी नेटवर्कची (NEON) निर्मिती केली आहे. या महाजालातील सोयीमुळे पर्यावरणाच्या निरीक्षकांना आपली निरीक्षणे, संशोधने एकमेकांशी सहजपणे जोडता येतील. यासाठी दूरसंवेदन (रीमोट सेन्सिंग) व पर्यावरणीय साधनसामग्री क्षमता (सायबर इन्फ्रास्ट्रक्चर) वापरली जाणार आहे. www.neonine.org या संकेतस्थळावर इच्छुक अभ्यासकांना अधिक माहिती उपलब्ध आहे.

'सायन्स' साप्ताहिकावर आधारित
खंड ३२३, २७ फेब्रु. २००९, पृ. ११७३

# शिनजँग वस्तुसंग्रहालय (Xinjiang Museum)

*चीनच्या रोचक प्रवास वर्णनातील हा एक पुढील भाग - संपादक*

ऊरुम्ची शहर वसले आहे वाळवंटात. पण या वाळवंटाला देखील मोठा इतिहास आहे. भारत, चीन, रशिया, इराण, अफगणिस्तान या अनेक देशांना जोडणारा प्राचीन रस्ता म्हणजे रेशीम पथ (Silk Route) या वाटेवरून अनेक व्यापारी ये जा करीत असत. भारतातील बौद्ध भिक्षुक बहुधा याच मार्गाने आले असावेत. अशी ही महत्त्वाची वाट ऊरुम्ची शहरातून जाते. या प्राचीन इतिहासाची साक्ष देत शिनजँग वस्तुसंग्रहालय ऊरुम्ची शहरात मोठ्या दिमाखाने उभे आहे. मागच्याच दशकात या वस्तुसंग्रहालयाची नवीन इमारत बांधण्यात आली. ही इमारत म्हणजे वास्तुकलेचा एक उत्तम नमुना आहे. दगडांनी बांधलेली ही इमारत वर्तुळाकार आहे आणि इमारतीच्या सर्वबाजूला झाडे लावलेली आहेत. त्यामुळे इमारतीचे सौंदर्य आणखीनच खुलून दिसते.

ऊरुम्ची शहरातील आठवडाभराच्या वास्तव्यात या संग्रहालयाला भेट देण्याचा योग आला. चीन हा तसा विस्तारने खूप मोठा देश आहे. या देशाचे व्यवस्थापनाच्या दृष्टीने ३५ भाग पाडले आहेत. त्यांना ते प्रॉविन्स (Province) असे म्हणतात. शिनजँग (Xinjiang) हे चीनच्या उत्तर पश्चिम भागात असलेले एक महत्त्वाचे प्रॉविन्स आहे. आकाराने हे देशातील सर्वात मोठे प्रॉविन्स म्हणून आळखले जाते. कझाकीस्तान, मंगोलिया इत्यादी देशांच्या सीमारेषेवर असल्याने या प्रॉविन्समध्ये वेगवेगळ्या जमातीचे लोक राहतात. ऊरुम्ची हे या प्रॉविन्सच्या राजधानीचे शहर आहे. म्हणूनच शिनजँग वस्तुसंग्रहालयाची निर्मिती या शहरात करण्यात आली आहे. नावाप्रमाणेच शिनजँग प्रॉविन्समधील प्राचीन संस्कृतींचे प्रदर्शन आपल्याला येथे पहायला मिळते.

विज्ञान प्रदर्शनाच्या कामातून सवड काढून अर्धा दिवस आम्हाला संग्रहालय पाहण्यासाठी देण्यात आला. दुपारचे जेवण झाल्यावर आमची बस प्रदर्शनाच्या ठिकाणाकडे न जाता वस्तुसंग्रहालयाकडे गेली. सुरक्षा तपासणी, प्रवेशाची तिकीटे आदी सोपस्कार आटोपून आम्ही मुख्य दालनात प्रवेश केला. संग्रहालयाची रचना वर्तुळाकार आहे आणि त्याच्या मध्यभागी तळमजल्यावरच इमारतीची प्रतिकृती आहे. इमारतीच्या कोणत्या विभागात आपल्याला काय पाहायला मिळेल याची कल्पना आपल्याला इथेच येते. त्यानुसार कोणत्या विभागात जायचे ते आपण ठरवू शकतो. तीन वेगवेगळ्या मजल्यावर वस्तू पद्धतशीर मांडून ठेवलेल्या आहेत. आयोजकांनी आमच्यासाठी इंग्रजी बोलणाऱ्या गाईडची व्यवस्था केलेली होती. थोडीशी पार्श्वभूमी सांगून झाल्यावर संपूर्ण संग्रहालय दाखविण्याचे आम्हाला तिने अभिवचन दिले. तिच्या सुचनेनुसार आम्ही तिच्या मागोमाग चालू लागलो. लवकरच आम्ही एका मोठ्या दालनात प्रवेश केला. तेथे काचेच्या कपाटात सुंदर गणवेश घातलेले पुतळे ठेवलेले होते. शिनजँग परिसरात ज्या वेगवेगळ्या जमाती आढळतात त्यांच्या शरीराची ठेवण आणि त्यांचे वस्त्रप्रावरण दाखविणारे ते दालन होते. प्रत्येक पुतळ्याजवळ इंग्रजी आणि चिनी भाषेत त्या जमातीबद्दल थोडक्यात माहिती दिली होती. ती मी वाचण्याचा प्रयत्न करीत होतो तोपर्यंत आमचे सहकारी पुढे निघून गेले. त्यामुळे लगेच त्यांच्या मागून जाण्याखेरीज माझ्यापुढे पर्याय नव्हता.

आमच्या गाईडने आम्हाला आणखी एका प्रशस्त दालनात आणले. येथे वेगवेगळ्या वाद्यांचे प्रदर्शन भरविले होते. त्यातील बरीचशी वाद्ये परिचयाची वाटली. म्हणून मी त्यांच्या शेजारी जाऊन त्यावर इंग्रजीत लिहिलेली नावे



संग्रहालयाची सुबक इमारत

वाचू लागलो. माझे प्रथम लक्ष गेले ते तानपुऱ्याकडे. त्यावर इंग्रजीत लिहिले होते तानबुरा (Tanbura). त्याचप्रमाणे सारंगी, सतार इत्यादी भारतीय वाद्ये तेथे ठेवलेली होती. या वाद्यांकडे पाहून हे लक्षात येते की जुन्या काळी भारत आणि चीन या दोन देशांमध्ये चांगलीच सांस्कृतिक देवाणघेवाण होत असावी. आपण जर इतिहास चाळू लागलो तर आपल्या लक्षात येते की बौद्ध भिक्षुक मोठ्या संख्येने भारतातून चीनमध्ये गेले. त्यांनी आपल्याबरोबर धर्मग्रंथांखेरीज अनेक भारतीय साहित्य नेले. अनेक भारतीय ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर करण्यात आले. याची प्रचीती हस्तलिखिताच्या विभागात येते. येथे अनेक प्रकारची हस्तलिखिते ठेवलेली आहेत. श्रीकुमार यांनी भाषांतरित केलेली अनेक हस्तलिखिते येथे मोठ्या प्रमाणावर आहेत.



संग्रहालयातील दुर्मीळ हस्तलिखित

वरच्या मजल्यावरच्या एका विभागात मोठेमोठे नकाशे लावलेले आहेत. द्विमितीय नकाशाबरोबरच काही त्रिमितीय रचना देखील येथे पाहायला मिळतात. त्यात शिनजँग प्रॉविन्स कसा आहे याची संपूर्ण कल्पना येते. वाळवंटाने वेढलेल्या या प्रदेशात मधूनमधून डोंगरदऱ्याचा भाग आहे. तसेच या भागात काही महत्त्वाच्या नद्या आहेत. या नद्यांच्या किनारी जुन्याकाळी वस्ती असावी असा कयास आहे. नदीकिनाऱ्यावर केलेल्या उत्खननातून याची खात्री पटते. या उत्खननात मोठ्या प्रमाणावर मातीची भांडी सापडतात. एका ठिकाणी तर एक मोठी स्मशानभूमीच आढळली. त्या स्मशानभूमीत पुरून ठेवलेली काही प्रेते काढून काचेच्या पेटीत ठेवलेली आहेत. इजिप्तमध्ये मृत शरीरावर प्रक्रिया करून आणि ते पेटीत घालून जमिनीत पुरण्याची प्रथा होती. अशा प्रेतांना मम्मीज असे म्हणतात. असाच काहीसा प्रकार शिनजँग परिसरात असावा असे वाटते. कारण उत्खननात शोधकर्त्यांना काही मम्मीज सापडल्या आहेत. त्यांचेही पद्धतशीरपणे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

उरुम्ची हे शहर रेशीम पथावर असल्याचा या आधी उल्लेख केलाच आहे. त्यामुळे रेशीम पथ नेमका कुठून आणि कसा जात होता याचे कुतूहल या शहरात येणाऱ्या प्रत्येकाला वाटणे साहाजिक आहे. हे कुतूहल शमविण्याची संधी शिनजँग संग्रहालयात मिळते. या संग्रहालयात रेशीम पथ दर्शविणारी एक मोठी त्रिमितीय प्रतिकृती ठेवलेली आहे. डोंगराळ भाग, टेकड्या, नद्या, वाळवंट अगदी स्पष्टपणे यात दाखविलेले आहे. त्यामुळे ही वाट किती खडतर होती याची पाहणाऱ्याला कल्पना येते. या रेशीम पथाची सुरुवात होते भारतातील अहमदाबाद या शहरापासून. ही वाट हिमालय ओलांडून चीनमध्ये जाते. नंतर एक वाट चीनच्या पूर्वेकडे जाते तर दुसरी वाट चीनच्या पश्चिमेला जाऊन रशियात शिरते. अनेक देशांना जोडणारा दुवा असे रेशीमपथाचे वर्णन करता येईल. या मार्गाने चीनमधील रेशीम

देशोदेशी पाठविले जायचे. त्याच्या बदल्यात ही व्यापारी मंडळी वेगवेगळ्या वस्तू वेगवेगळ्या देशांतून आणत असत. भारतातून प्रामुख्याने मसाल्याचे पदार्थ पाठविले जात. एका ठिकाणाहून निघालेला व्यापारी या पथाच्या अगदी दुसऱ्या टोकापर्यंत कचितच जात असे. वाटेत भेटणाऱ्या व्यापाऱ्याशी देवाणघेवाणीचा व्यवहार करून हे व्यापारी आपल्या देशाला परत जात असत. ज्यावेळेस दळणवळणाची आजच्यासारखी सुविधा नव्हती तेव्हाची ही गोष्ट आहे. मालाची ने आण प्रामुख्याने घोडे, उंट, बैल यांच्या मदतीने केली जायची. रस्ते देखील आजच्या सारखे नव्हते. त्या परिस्थितीत प्रवास करणे किती जिकरीचे असेल याची कल्पनाच केलेली बरी.

संग्रहालयातील अनेक दालने बघता बघता संध्याकाळ कधी झाली हे कळलेच नाही. हॉटेलवर परत जाण्याची वेळ झाली होती. तरीही आणखी एक दालन आम्हांला खुणावत होते. ते होते गालीच्याचे दालन. येथे अनेक प्रकारचे गालीचे टांगून ठेवलेले आहेत. गालीचे कसे विणले जातात, कोणती यंत्रे वापरली जातात याचेही चांगले प्रदर्शन येथे आहे. याखेरीज चिनी मातीची रंगीबेरंगी भांडी संग्रहालयात ठेवलेली आहेत. चकाकणाऱ्या दगडाच्या अनेक मूर्त्या देखील ठेवलेल्या आहेत. संग्रहालयातून बाहेर पडताना आपण संग्रहालयाच्या विक्रीकेंद्रात जातो. तेथे अनेक वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या आहे. वस्तूंच्या किंमती युहानमध्ये लिहिलेल्या असतात. एक युहानला साधारणपणे साडेसहा रुपये पडतात. त्यामुळे वस्तूवर लिहिलेली किंमत पाहून आम्ही त्याला साडेसहाने गुणत असू. असे केल्याने त्या वस्तूची रुपयात किंमत किती याची आम्हाला कल्पना यायची. दुकानात एवढ्या वस्तू होत्या की ते पाहून मला बालपणी वाचलेली एक कविता आठवली. "हे घेऊ का ते घेऊ, दुकान उचलुनी का नेऊ". दुकान उचलणे आपल्यापैकी कुणालाही शक्य नव्हते. परंतु प्रत्येकाने आपापल्या आवडीने वेगवेगळ्या वस्तूंची खरेदी केली. विशेषत: मित्र मैत्रिणींना आणि नातेवाईकांना भेट म्हणून द्यावयाच्या अनेक वस्तूंची खरेदी येथे करण्यात आली. अर्धा दिवस सार्थकी लागला या भावनेने गाईडचे आभार मानून आम्ही संग्रहालयाच्या बाहेर पडलो.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

## बात खबरबात

➪ जीवरसायनशास्त्र व रचनात्मक जीवशास्त्र यांचे प्रणेते फ्रेडरिक रीचर्डस (१९२५ ते २००९) यांचे ११ जानेवारी रोजी ९३ व्या वर्षी कनेटीकट येथे निधन झाले.

➪ सौर शक्तीचा वापर खूप कमी होतो. यामागे अनेक कारणे आहेत. त्यातील एक कारण म्हणजे या प्रक्रियेत लागणाऱ्या सिलीकॉन घटांची किंमत हे होय.

➪ चीन मधील लिंग गुणोत्तर प्रमाण १२० पुरुष १०० स्त्रिया असे आहे.

➪ सॅंड्रा फॅबर यांना फिलाडल्फियाच्या फ्रॅंकलिन इंस्टिट्यूटचा २,५०,००० डॉलर्सचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला. विश्वाची उत्क्रांती व रचना या विषयातील योगदानाबद्दल त्या सदर पुरस्काराच्या मानकरी ठरल्या.

**'सायन्स' या साप्ताहिकावरून संकलित**
**(संदर्भ - खंड ३२३, फेब्रु. २००९)**

●●●

*विवेक शक्ती मूढ बुद्धीतील हीनत्व काढून ती शुद्ध करते.*

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. बसवंत साने यांची ही लेखमाला प्रदीर्घ आहे. तिचा हेतू व आजवर या लेखांतून सांगितलेले विचार यांचा सार रूपात या लेखात आढावा घेतला आहे - संपादक*

**प्रास्ताविक :**

गेली काही वर्षे मी ह्या विषयावरच सातत्याने लिखाण करतो आहे. थोडेसे मुक्त चिंतन असे त्याचे स्वरूप झाले आहे.

ह्याचे मूळ कारण म्हणजे माझे मित्र श्री. मोहन पाठक यांना, मी 'भारतीय संस्कृती' वरती कोणती व कोणत्या लेखकांची पुस्तके वाचावीत असे विचारले, तेव्हा, त्यांनी केळकर द. के., सातवळेकर, साने गुरूजी अशी काही प्रसिद्ध नावे घेतली.

**संस्कृतीचे एकांगी दर्शन :**

मी ही सर्व पुस्तके जरूर चाळली. मग, माझ्या लक्षात आले की ह्या प्रत्येक पुस्तकाच्या मागे, एक 'विशिष्ट धारणा', लेखकाच्या मनात आहे. तेवढीच मर्यादित मांडून तो थांबतो. पण, संस्कृती हा विषय आभाळाएवढा गहन व मनोहर आहे.

ह्या माझ्या विधानावर मला वादंग नको आहे. कारण, प्रत्येकाच्या भावना शुद्धच आहेत, आणि एखादा हेतू मनात धरून लेखन करणे, हे अत्यंत स्वाभाविक व स्वागतार्हच आहे.

पण, मी मोहन पाठक यांना सांगितले होते की, जोपर्यंत मला एखादा नवीन मूलभूत दृष्टिकोन सापडत नाही, तोपर्यंत मी ही लेखणी चालवणार नाही.

आतापर्यंत, संस्कृतीचे भावनात्मक वर्णन, रीतीरिवाज, चालीरिती सामाजिक नीतिमत्ता ह्यांचे वर्णन. हे झाले पण, मुळाला हात घालावयाला हवा आहे. संस्कृतीचे मूळ शोधावयाला हवे.

संस्कृतीच्या युगानुयुगाच्या प्रवाहाचे ऐतिहासिक वर्णन, मग त्यातील आर्यधर्माचा वारसा, आर्क्टिक प्रदेशांतून वायव्येकडून, अफगाणिस्तानातून गंगाकाठी आगमन, वगैरे दृष्टिकोन मांडण्यात आले व लक्षात आले.

त्याचबरोबर, भारतभूमीच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात राजकीय उद्दिष्टांसाठी आपल्या संस्कृतीची स्मृती जागवण्यासाठी एका सत्वशील सुसंस्कृतपणे, पण थोड्याशा राष्ट्रीय 'अभिनिवेशाने' संस्कृतीच्या अस्मिता रूपाला पुन: नव्याने रंग देण्याचे 'लेखन प्रयोगही' पाहिले - वाचलेही!

भारतीय संस्कृतीतील कला, सौंदर्य, आंतरिक गाभा व विशिष्ट सांस्कृतिक मूल्ये यांचा मागोवा घेणारे लेख व पुस्तके, तसेच भारतीय नृत्य, नाटके, पोवाडे, काव्य, कादंबऱ्या, बखरी ह्याही पाहिल्या. कालिदास, भवभूतीपासून काका कालेलकर, आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, विजय तेंडुलकर, गिरीश कर्नाड व इतर अनेक थोर मराठी, हिंदी, गुजराथी, दक्षिणी दिग्गज लेखकांचे ओझरते दर्शन घेतले. भारतातील भिन्न भाषिकांचे, प्रांतियांचे साहित्य पाहिले - ओझरते!!

भारतीय संस्कृतीतील 'अध्यात्मशास्त्राचा' धार्मिक भावनांचा, विश्वरचनेचा, ईश्वर संकल्पनेचा संतांचा अत्यंत जोरकस प्रवाह सुद्धा थोडासा अनुभवला.

माणसाच्या केवळ १०० वर्षे या 'अपर लिमीट' एवढ्या तुटपुंज्या पुरवलेल्या आयुष्यक्रमात घालवलेल्या

*तीन दगड मांडले की, चूल तयार होते.*

जवळजवळ ७५ वर्षे, माझ्या प्रवासात, मुक्तपणे ह्या अभ्यासात खर्च केली.

**संस्कृती-मानवी जीवन प्रवाह-अनंताचा :**

खरे सांगतो की, ह्या भूमीवर ज्या मानवी समाजाने राजकीय, आर्थिक, धार्मिक, नैसर्गिक उलाढाल्या पाहिल्या - भोगल्या-अनुभवल्या, त्या मृत जीवांची आठवण हृदयांत हेलकावे खाऊ लागली. कुठल्या सांस्कृतिक प्रवाहात हे जीव सामील झाले होते? ह्या सांस्कृतिक स्रोतात न्हायले, पोहले, रंगले, विवश झाले व नंतर परलोकी गमन झाले?

कुठल्या, आगळ्या वेगळ्या आठवणी, अनुभूती, भावनांचे हिंदोळे त्यांनी मनात साठवले? कुठल्या सांस्कृतिक वारसा प्रवाहात ते ओढले गेले आणि त्यांतील कुठल्या 'स्मृती-मूल्ये' व 'अनुभूती' त्यांनी पुढच्या पिढीला दान केली? 'कळत नकळत' त्यांनी कुठला व कोणत्या जातीचा, श्रेष्ठश्रेणीचा भारतीय सांस्कृतीचा ठेवा, पुढच्या नवीन पिढीसाठी, दृश्यात जपला व नंतर स्वत:च्या 'आत्मयज्ञाने' तो पुढील अनंताच्या प्रवासातील जीवात्म्यांना अर्पण केला? ह्या समाजऋणाचा संदर्भ आहे संस्कृतीच्या प्रवाहाला!!

**ऋषीचे कुळ व नदीचे मूळ :**

कुठल्याही नदीचे मूळ व प्रवाहाची वळणे स्वतंत्र असतात. त्या नदीची पात्रे कधी विशाल रुंद, गूढ, खोल व दिशा वळणे, नद्यांचे संगम आणि त्यांतील 'दिव्य जीवन प्रवाही जल', ह्यांची वेगवेगळी दर्शने व स्वरूपे असतात.

काही नद्या फक्त काही 'ऋतू' पुरत्याच वहातात. तर काही नद्या बारमाही असतात. मानवी संस्कृतीच्या इतिहासात असा हा फरक सुद्धा जाणवेल.

नद्यांच्या उपमा निरनिराळ्या संस्कृत्यांना का बहाल करण्यात आल्या आहेत? 'व्होल्गा ते गंगा', ॲमेझान, चीनमधील यांगत्सी नदी वगैरे.

भारतातील 'सरस्वती नदी'. ही प्रतीकात्मक पद्धतीने 'आर्य' ह्या 'संस्कृति निदर्शक' नावाने व भारतीय 'हिंदू' नावाने ओळखली जाते.

समाजाला अनेक युगे प्रवाहित असणाऱ्या व आजही पुष्कळ अंशांनी जिवंत असणाऱ्या (Civilization) एका संस्कृतीची आठवण करून देते!! पण, नदीचे मूळ व ऋषीचे कुळ (कुल) शोधूं नये असे म्हणतात. का बरे?

**त्रिशुक्ल व स्कंद पुराण :**

माझे मित्र डॉ. धनंजय डोंगरे ह्यांनी त्यावर प्रकाश टाकला. कुठल्याही माणसाचे व्यक्तिमत्त्व 'त्रिशुक्ल' पद्धतीने जाणले जाते.

१) माणसाचा जन्म व कुल

२) माणसाचे शिक्षण वा ज्ञान

३) माणसाचे वर्तन वा आचार

मग नदीचे कुल व मूळ कोणते? गंगा नदीचे 'गंगोत्री'?

एव्हढेच, जाणणे नव्हे, तर ज्या अलौकिक प्रयत्नाने 'वामन' अवताराने ब्रह्मांडाच्या पलीकडील 'आकाशगंगा' आपल्या एका पायाच्या अंगठ्यांच्या नख स्पर्शाने व पृथ्वीवर ठामपणे रोवलेल्या दुसऱ्या पायाच्या मदतीने, ह्या पृथ्वीतलावर आणली, ती ह्या भारतातल्या गंगेच्या उगमाची कथा होऊ शकते. ही कथा स्कंद पुराणात आहे.

पुराणे ह्या भौतिक 'बखरी' नव्हेत. त्या आगम ज्ञानाचा इतिहास आहे.

ह्या आकाशगंगेचाच एक लहानसा अंश भौतिक म्हणजे भारतात अवतरलेली गंगा.

पुढे, 'भगीरथ प्रयत्नाने ती 'जान्हवी' हे दुसरे नाव व 'उत्तर अंशाच्या प्रवाहाला' घेऊन, बंगालच्या सागराला

---

*मन स्वाधीन करण्यासाठी उपासनेला दृढ चालवावे लागते.*

मिळते.

तिच्या ह्या पृथ्वीवरील जड स्वरूपांतील रूपाला '**गंगा अवतरण**' व शिवशंकराच्या प्रसादाचेही एक 'दर्शन स्वरूप' आहे. हे 'मानवी चक्षुंना' अदृश्य आहे.

पण, ह्या उगमाच्या व कुलाच्या कथेवर आपला विश्वास आहे. ही गंगा-शिवशक्ती म्हणजेच कुंडलिनीशक्ति होय. प्रत्येक मानवी शरीरात ती प्राप्त आहे.

शिवाय, हे '**गंगाजल**' इतर नदीजलापासून निराळे व पवित्र आहे. '**देवात्मशक्ती**' ह्या **स्वामी विष्णुतीर्थ महाराज** ह्यांच्या ज्ञानाप्रमाणे हिमालयासारख्या उत्तुंग शिखरावर पडणारा पर्जन्यजल हा '**समुद्रजल**' ह्या स्तरावर रहात नाही, कारण, त्या उंचीवर त्याला सूर्यभगवानाच्या 'सुषुम्ना किरणांच्या' मार्फत 'सोमरसाची' प्राप्ति होते. गंगाजलांत हा अंशात्मक 'सोम' आहे, व म्हणून ते पवित्र आहे. म्हणूनच ते मृत्यूसमयी प्राशन करतात.

**सांस्कृतिक नदीचा उगम व प्रवाह :**

नदीची मानवी संस्कृतीला व तिच्या कालबद्ध प्रवाहाला उपमा देताना, तिच्या उगमाबद्दल उत्सुकता उदभवणे स्वाभाविक आहे. पण, महत्त्वाचा प्रश्न हा आहे की जसे नदीच्या व्यक्त व दृश्य स्वरूपावरून तिच्या 'उगमाच्या पूर्वीच्या क्रिया' सहजासहजी प्राप्त होत नाहीत.

तसेच जवळ जवळ संस्कृतीच्या उगमाबद्दल म्हणावे लागेल. मानवजातीच्या पृथ्वीवरील इतिहासांत हा संस्कृतीचा उगम कधी झाला व त्याची 'बीज निर्मिती व संवर्धन क्रिया व आधार कोणता ह्याचा फारसा विचार झाला नाही.

**ह्या संस्कृतीचे दोन टप्पे पाडले तर तिचा जड व भौतिक वास्तव्यात जो, प्रवाह व उगम दिसतो. त्याचे 'जन्म व कुल' रहस्य 'अव्यक्त' जगांतच शोधावे लागते.**

(पुरुषसुक्त)

तसा शोध मी दिशाच्या जानेवरी २००९ च्या अंकात घेतला. तिथे एक प्रश्न उपस्थित केला होता!!

''रोमन, ग्रीक वगैरे अनेक संस्कृत्या नाहीशा झाल्या, पण भारतीय संस्कृतीचा प्रवाह सर्वांत जुना व सातत्याने प्रवाहित आहे. एवढेच नव्हे तर नजीकच्या काळातील वैदिक बीजांशी ह्या संस्कृतीचा जो आधार दाखविता येतो व त्याचा एक विशिष्ट प्रभाव अनेक शतके सध्याच्या मानवाला माहीत असलेल्या इतिहासातील ज्ञानात आहे. त्याचे काय कारण व कोणते सामर्थ्य?

त्या अंकातील 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना' ह्या शीर्षकाखालील लेखात 'संस्कृती' ह्या शब्दाने व्यक्त होणाऱ्या संकल्पनेचा मूळ उगम व आधार हा '**ऐतरेय ब्राह्मण**' मध्ये मिळाला हे पाहिले. शिवाय, 'संस्कृती' ह्या शब्दापेक्षाही जास्त गार्भित अर्थ हा '**कृष्टि**' ह्या शब्दामागील संकल्पनेत आहे असा संयुक्तिक वाद **डॉ. निहार रंजन राय** ह्यांनी केला हे पाहिले.

मग, डॉ. निहार रंजन राय ह्यांनी **महर्षी रवीन्द्रनाथ टागोर** ह्यांच्या **'संस्कृति' ह्या शब्दापेक्षा वेदिक, उपनिषदिक 'कृष्टि'** शब्द हा जास्त प्रभावीपणे व संपूर्णपणे भारतीय संस्कृतीची थोर भूमिचा दर्शविते असा आग्रह का धरला हा प्रश्न पडतो.

ह्या प्रश्नाचे उत्तर व मागोवा मी 'दिशाच्या जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल व मे २००९ च्या अंकातून घेतला. त्यांतील मुद्यांचा पुन: उल्लेख मी करीत नाही, पण, संस्कृतीकडे बघताना तिच्या बीज संकल्पनांकडे बारकाईने का पहावे व तसे केल्यास काय सापडते, हे या लेखमालेतून स्पष्ट व्हावे!!

'देवशिल्प, मानुषशिल्प आणि कुलशील व आचार' या संकल्पना अंतर्भूत भारतीय संस्कृतीची मूलगामी धारणा

आहे, हे ध्यानात यावे. एवढेच नव्हे, तर हापूसच्या आंब्याच्या बाठीला (बीजाला) रसाळ, मधुर फळेच येतील ही अशी हमी देता येते, तशीच 'कृष्टि' ह्या संकल्पनेतून होणाऱ्या सांस्कृतिक प्रवाहातून भारतीय संस्कृतीची गोड, मधुर व पवित्र अशी मूल्याधिष्ठित फळेच निर्माण होतील अशी खात्री देता येते व अनुभवाला येते. ती फळे कांही नमुन्यादाखल भारतीय संस्कृतीच्या 'शील व कुल' संकल्पनेत सामावलेली आहेत. त्यांची चर्चा आपण करत आहोत.

ह्या विशेष ज्ञानातून कोणते दृष्टिकोन स्पष्ट होतात?



देवशिल्प - नर्तकी

प्रथम, म्हणजे 'देवशिल्प' ही कृती ईश्वर निर्मित आहे; तर 'मानुषशिल्प' ही ह्या देवशिल्पाच्या कृतीची, मानवाच्या कुवतीनुसार व शक्तिनुसार बनणारी एक नक्कल किंवा 'अनुकृती' आहे. त्यामुळे मानवाच्या जन्मजन्मांतरीच्या, युगायुगाच्या व पिढ्यानपिढ्या चालणाऱ्या सांस्कृतिक प्रवासात त्याच्यापुढे सतत 'एक आदर्श नमूना' वा 'शिल्प' ''Live Demo Sclupture'' उपलब्ध आहे व त्याला स्वत:च्या कृती अविष्काराचे स्वातंत्र्य असूनही एक आदर्श नमुना डोळ्यासमोर सतत आहे. केव्हढी ही देणगी!! केवढी मोलाची ही योजना!!

संस्कृतीच्या मूळ गाभ्यात जर उच्च नैतिक व जीवनवादी सौंदर्यवादी नवीन मूल्ये निर्माण होत नसतील, तर ती संस्कृती व तिचा प्रवाह हा कुचकामाचा आणि प्राणी जीवन सदृश्य व केवळ 'भोग संस्कृतीचा' प्रवाह गणला जाईल. त्यामुळे, निरनिराळ्या संस्कृत्यांच्या जातींची तुलनात्मक परिक्षा केल्यास ती त्या संस्कृतीच्या दर्शनी व मूलभूत जीवनमूल्यांची करावी लागेल, आणि त्या मूल्यांच्या निर्मितीची प्रक्रिया निर्दोष, सतत चालणारी दिसत असल्यास, तिच्या 'सांस्कृतिक बीजाचा' विचार करावा लागेल नाही का? भारतीय संस्कृतीच्या ह्या बीजांचा शोध घेण्यासाठी २००४ पासून २००९ पर्यंत दिशाच्या अंकात हा वैचारिक संशोधनात्मक पसारा मी मांडला आहे.

**मागील आढावा :**

ह्या अंकात ह्या प्रयत्नांचा एक लहानसा आढावा घेण्याचा मी प्रयत्न करतो आहे. उद्देश हाच की भारतीय संस्कृतीची 'दैवी धारणा' कोणती व तिच्या बीजाचे खरे सामर्थ्य कोणते? ह्या संस्कृतीची वाटचाल कोणत्या दिशेने होते आहे व तिचे अंतिम हेतू काय आहेत?

माझी मनोमन खात्री आहे की ह्या पृथ्वीवर होणाऱ्या मानवी जीवन व्यापाराला नक्कीच कांहीतरी 'दैवी हेतू' आहेत. त्या हेतूंची गूढ दिशा ओळखण्याची हाक व आकाशवाणी 'गायत्रीच्या अनाहत स्पंदाने' मानवी हृदयांत स्फुरत आहे आणि त्या 'मानुषशिल्पाला' देवशिल्पाहूनही सुंदर करण्याची क्षमता मानवी जीवांना प्राप्त व्हावी हा ह्या भारतीय संस्कृतीच्या जिवंत प्रवाहाचा हेतू आहे.

मी केलेल्या ह्या प्रवाहाची काही वर्णने सूत्ररूपाने पाहू या. संस्कृतीचा हा प्रवाह जसा बीजाच्या मूलभूत सशक्त

वर्णांवर आधारून असतो तसाच तो ह्या पृथ्वींवरच्या वृंदावनात काही सूत्रे, सृजनशक्ती असलेल्या बश संकल्पना घेऊन येतो.

त्यामुळे ह्या प्रवाहाला गंगेसारखेच पवित्र उगमस्थान, सुयोग्य पात्र, खोली व भूमि लागते. म्हणूनच ह्या वैशिष्टपूर्ण संस्कृतीला सुयोग्य अशी रचना चौकट सुद्धा लागते. तशी ही 'भा+रत' (आध्यात्मिक रस असणारी) भूमि व कालीदास वर्णित ऋतूसंहाराची प्रकृति सुद्धा लाभली आहे. काय आहेत याचे पुरावे व संदर्भ?

**दिशा - लेखमाला संग्रह :**

'दिशा' मध्ये ह्याचा शोध कसा घेत गेलो ते पाहू या!! 'दिशा' व्ही. पी. एम. ठाणे, मधील लेखमाला 'भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना'

| दिशा अंक | उतारे व संदर्भ |
|---|---|
| **जून २००४** | 'स्वामी विवेकानंद रामकृष्ण व आपण' |
| पृष्ठ क्र. २०-३३ | ''नरेन्द्र दत्त' या बंगाली तरुण व्यक्तीची व रामकृष्ण परमहंस या अद्‌भुत अवतारी पुरुषांची जी परस्पर पूरक जीवनयात्रा झाली तिच्या ऐतिहासिक वैशिष्ट्याकडे लक्ष वेधायचे आहे.'' |
| | आध्यात्मिक (स्पिरीच्युअल) क्रांती. |
| पृष्ठ क्र. २२ | ''या तऱ्हेच्या बुद्धीवादाचा संसर्ग-संबंध-संघर्षही नरेन्द्र या प्रतिकामार्फत रामकृष्ण परमहंस सारख्या स्पिरीच्यूअल व्यक्तीशी आला - ही नुसतीच मोठी घटना केवळ दोन व्यक्तींपुरती मर्यादित नसून ती एकंदरच दोन मानवी धर्मांच्या संघर्षाची संवादाची होती. हा एक ऐतिहासिक टप्पा होता.'' |
| पृष्ठ क्र. २३ | 'स्पिरीच्यूऑलिटी' ही संकल्पना अजूनही समाज मानसात खऱ्या अर्थाने ज्ञात नाही. |
| पृष्ठ क्र. २४ | 'नरेन्द्र दत्त' यांचा रामकृष्णांच्या मार्फत होणारा 'शक्तिपात' आणि त्यानंतरचे 'स्वामी विवेकानंद' या नावाने झालेले कार्य, हे या संदर्भात जाणले पाहिजे. नाहीतर, फक्त मनोरंजक, अविश्वार्ह, अद्‌भूत कथा या भूतलावर झाली- या 'भक्तीभावापुढे कोणतीही प्रगती होणार नाही. इथे शक्तिपात' म्हणजे काय व त्याची आवश्यकता काय असा नैसर्गिक, प्रश्न पडावयाला हवा. |
| पृष्ठ क्र. २९ | 'अतिंद्रिय ज्ञानाचा' हा अनुभूती व ज्ञान संक्रमाणाचा 'भारतीय प्रकार' याला समाजमान्यता, राजमान्यता व विज्ञान-मान्यता बिलकूल नाही. याचा एक उघड अर्थ हा की ज्ञानाचा व्यवहार या |



स्वामी विवेकानंद

ज्ञानाचे अधिष्ठान म्हणजेच भगवंताचे अधिष्ठान होय.

जगात एका सांप्रदायिक (भौतिक विज्ञानवादी) पूर्वग्रही पद्धतीनेच होत आहे. त्याचे प्रणाली बाहेर सत्यशोधनाशी वावडे आहे. आपलाच शब्द व पद्धती तिला प्रिय आहे.''

पृष्ठ क्र. ३० सायन्सचा खरा हेतू शोध घेणे व उत्तर शोधणे हा असूनही गूढ अध्यात्माशी संबंध आला की त्याचे शत्रुत्व जागे होते - जॉर्ज इलियट

**नोव्हेंबर २००५**

पृष्ठ क्र. २२ - २९ ज्ञानक्षेत्रातील साम्राज्यवाद

पृष्ठ क्र. २२ ''प्रज्वालितो ज्ञानमय प्रदीप:'' - वि. प्र. मं. चे ब्रीदवाक्य

॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते॥

- ठाणे नगरवाचन मंदिर

''हा व अशा उत्तम संस्था अजाणतेपणाने बहुतांशी एक ज्ञानाच्या क्षेत्रातील 'साम्राज्यवादाच्या' गुलाम झालेल्या आहेत असे ठामपणे प्रतिपादावयाचे आहे. हा साम्राज्यवाद छुपा न जागवणारा व नवनव्या पिढीतील जीवांना ह्या 'जागतिक साम्राज्याच्या गुलामगिरीत सामील करून घेतो आहे.'' ''ह्या साम्राज्यवादाच्या अंमल प्रचलित राज्यपद्धती, शिक्षण पद्धती, संस्कारशून्य शिक्षण, पाश्चात्य युरोपियन संस्कृतीला श्रेष्ठत्व प्रदान करणारा जीवन व्यापार, ह्या मार्फत चालतो.''

संदर्भ - जॉन रॉल्स, जोसेफ चिल्टन पियर्स, जॉन गॅटो, रूडॉल्फ स्टीनर, डेस्काटेज एरद् न्यूरोकार्डिऑलॉजी, डॉ. मारिया कुलाव्हिटो.

पृष्ठ क्र. २६ (The Bilcultural Paradigm - 1995) Culture conditions and stimulates biology, while biology conditions and makes culture possible.

पृष्ठ क्र. २७ थॉमस मेकॉले - १८३१

पृष्ठ क्र. २९ ''Musical Epistemology'' सामवेद, भगवद् गीता, दिशा २००५

**फेब्रुवारी २००५**

पृष्ठ क्र. १८-२५ सांस्कृतिक महायुद्धे सॅम्यूएल हटिंग्टन: The clash of civilizations and the Remaking of world order. संघर्षाचे विषय, बलीयुद्धे, राष्ट्रयुद्धे व आसुरी जगज्जेते, लँड व मार्केट, पक्षपाती अज्ञानी विचारवंत, पशुवृत्ती हा स्थायी भाव, संहाराची व्याप्ती व वृद्धी, आत्मपरीक्षणाचा अभाव

पृष्ठ क्र. २० प्रत्येक संघर्ष एक 'आदर्शवादी ध्येय' स्वप्नांचा मुखवटा घालूनच येत होता. प्रत्यक्षात मानवी मनाच्या तळाशी ठामपणे लपलेला तामसी पशू हा 'रामाचा मुखवटा' घालून रावण युद्ध करत होता.

पृष्ठ क्र. २१ संस्कार क्रियेतील उगम, दैवी संपदा युद्धाचे पोवाडे, हिंदूंची जबाबदारी, सिद्ध सनातन संस्कृती - प. पू. गगनगिरी महाराज

**एप्रिल २००५**

पृष्ठ क्र. १०-१३ डॉ. अँटोनिओ टी. डी. निकोलास - कुठल्याही संस्कृतीचा अभ्यास करावयाचा असेल तर त्या संस्कृतीला ज्या 'विशिष्ट मॉडेल' चे रूप प्राप्त झाले त्याचा तलास, शोध व जाणीव होणे जरूर आहे.

पृष्ठ क्र. १० 'भगवद्गीता' ही एका Audial, Musical, Culture (श्रुती) संगीत संस्कृतीमध्ये सांगितली गायली गेली "याप्रमाणे श्री. भगवंतानी गायलेल्या म्हणजे सांगितलेल्या उपनिषदांत ब्रह्मविद्यांतर्गत योग म्हणजे कर्मयोग - शास्त्रावरील श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादातील ज्ञानकर्म संन्यास योग नावाचा चौथा अध्याय समाप्त झाला" लोकमान्य टिळक भाषांतर - आपण जी गीता जाणतो ती 'संहिता लिखीत' अशा स्वरूपातच!!

मग कोणत्या गोष्टी ह्या ज्ञानपद्धतीतून सुटत असतील बरे? ह्याचा अभ्यास करू या.

ह्या विश्वाचे दोन भाग आहेत. व्यक्त, नाशिवंत व हे दिसणारे जड जगत १/४ व्याप्तीचे व अव्यक्त पण चिरंतन अस्तित्वाचे आणि ३/४ व्याप्तीचे. पुरुषसुक्त, ऋग्वेद, नारायण ऋषी.

पृष्ठ क्र. १२ तेव्हा मग ह्या पूर्ण जीवनदृष्टीला, वेदिक संस्कृतीला आवश्यक झाली - दोन जगांचे - व्यक्त व अव्यक्त जगांचे संमिलन घडवून आणणारी साधने. युक्त्या, तंत्र, नियम, भाषा, दर्शने, व्यापार, आचारधर्म व ते वापरण्याचे 'अधिकार, पात्रता, नैतिकता, समज आणि संस्कृतीच्या अंतिम ध्येय धोरणाला अशी जीवनशैली व त्यातील प्रगती व सिद्धता.

**मे २००५**

पृष्ठ क्र. ८-१४ व्याहृति - अव्यक्तम अनंतम् व व्यक्तम ह्यांची प्रतिकात्मक चित्रे - Ref. - The science of Yogo-Yogi Aprabudha तीन सप्तके (संगीतातील)

Dr. Frodrics Blanker म्हणतात - This universe is a great accoustical pattern. The seven planes are identical with the seven notes of the Indian Musical Scale.

योगी अप्रबुद्ध म्हणतात -


"The existence of a cosmos is due to the undulations of the primary substance between the two points Avyakta and Vyakta"

भगवद्गीता (अ ८,१८,१९) हा (ब्रह्मदेवाचा) दिवस सुरू झाला म्हणजे अव्यक्तापासून सर्व व्यक्त (पदार्थ) निर्माण होतात आणि रात्र सुरू झाली म्हणजे पूर्वोक्त अव्यक्तात लय पावतात.

भूतांचा तोच समुदाय (याप्रमाणे) पुनः पुनः जन्मून अवश होतसाता म्हणजे स्वतः इच्छा असो व नसो (यंत्रात

---

*कोणत्या कारणाने माणूस हसतो, हे पाहूनच त्याचे चारित्र्य ओळखले जाते - जे. वोल्फगँग*




गातल्याप्रमाणे) रात्र सुरू झाली की (पुनः) जन्मतो. (भाषांतर - लो. बाळ गंगाधर टिळक)

योगी अरविंद - 'परमेश्वराने हे जग एका गुंतागुंतीच्या जगाच्या क्रमामध्ये रचले आहे. आपल्याला ते देहांतर्गत व देहाबाहेर सापडते. आणि आपण ते संकल्पनास्वरूपांत जाणतो, वस्तुनिष्ठपद्धतीने अनुभवतो भोगतो.

पृष्ठ क्र. ११ देववाणी संस्कृत का? मंत्रशास्त्र, गणेशविद्या, दुर्गा शक्ती साधना कुंजिका

पृष्ठ क्र. १२ वेदविद्या नाहीशी झालेली.

पृष्ठ क्र. १४ ह्या सर्व 'क्रिया' निव्वळ 'शुष्क' कर्मकांडाच्या अंगाने आज ज्ञान आहेत.

## जून २००५

पृष्ठ क्र.८-१४ सेक्यूलर संस्कृती, बांजापासून फारकत, नॅशनल कल्चर - आबिद हुसेन-भेळपुरी संस्कृति संस्कृतीचे विज्ञान, वैश्विक मानवी संस्कृती (सनातन) सांस्कृतिक मॉडेलस् - संस्कृतीची निद्रितावस्था-मृतावस्था भारतीय वैशिष्ट्ये - आध्यात्मिक, वैश्विक, 'देश व जाति' - पारिभाषिक संज्ञा, संस्कृतिची साधने - संस्कार क्रिया, यज्ञ, कर्मकांडे.

## जुलै २००५

पृष्ठ क्र. २२-२९ संस्कृती या संकल्पनेची व्याख्या जॉन एच् बोडले (John H. Bodly वॉशिंग्टनच्या डिपार्टमेंट ऑफ अँथ्रॉपॉलॉजीचे चेअरपर्सन. Topical, Historical, Behavioral, Normative, functional, Mental, Structural, Symbolic.

What people do?

What they do?

material products they produce? ह्या यादीत 'स्पिरीच्यूअल धर्म - नाही, म्हणजे आत्म्याची गुणात्मक वृद्धी किंवा संस्कृती नाही.

पृष्ठ क्र. २७ मिस्टर पॅट वार्ड-ब्रिटीश मल्टी, कल्चर संकल्पनेवर टीका.

कॅनडा - बहुजाति संस्कृतिवादाचे उदाहरण Federal Policy of Multi Culturalism.


---

*जेव्हा माणूस स्वतःवर हसणं थांबवतो ते इतरजण त्याची खिल्ली उडवतात - थॉमस झाझ*

पृष्ठ क्र. २८ — अर्बीद हुसेन यांचा वेद द्वेष 'The problems of a New Cultural Synthesis'

We must get rid of the futile mentality, which urges some of us to try to revive the cultural life, which prevailed during the vedic or Puranic ages.

For, this implies the exclusion of all elements, which have come from outside, specially those of the **Musilm Culture;** there have been so Completely assimilated in the intellectual, aesthetic and social life of India that they have as it were, entered the stream of the life blood running through the veins of Indian Culture.



The attcmpt to separate these ingrediants and get them out of the systems through a process of blood letting will never succeed, it will only enervate our culture and cause it to suffer from pernicious anaemia" (p. 163 - The National Culture of India)

**ऑगस्ट २००५**

पृष्ठ क्र. २५-३२ — पा. नं. २५ महायोगी अरविंद घोष (पॉंडिचेरी) ''The significance of the lotus is not to be found by analysing the secrcts of the mud from which it grows here.

Its secret is to be found in the heavenly archtype lotus that blooms for ever in the light above. (Sri. Aurobindi letters on Yoga, P. 1609)



कमळाचे महत्त्व व सौंदर्याचा शोध ज्या चिखलात ते उगवते त्या चिखलाच्या रहस्यात किंवा पृथक्करणात सांपडत नाही. त्या (कमळाचे) रहस्य आकाशातल्या (अव्यक्तातल्या जगात) कमळाच्या 'संकल्पनेत' व प'प्रकाशात सांपडेल, तिथे ते अनंत काळपर्यंत उमलत राहिले आहे.''

पृष्ठ क्र. २७ — तीन मितीचे तत्त्वज्ञान - पिट्रीम सोरोकिन - रशियन विचारवंत. त्यांचा आधार ''Enormous Statistical labor''

पृष्ठ क्र. २८ — स्ट्रक्चरल अॅनालिसिस - सोरोकिन.

पण, ह्या सर्व अभ्यासाचा आधार व शास्त्र हे ह्या बदलांचे दृश्य वा बाह्य स्वरूप व त्याचा स्टॅटिस्टिकल ॲनालिसिस हाच आहे.

या अभ्यासाला सीमा पडतात व तशा त्या पडलेल्या आहेत.

पृष्ठ क्र. २९ वैदिक ज्ञानमार्ग Vedic Epistemology व पद्धती व तंत्र ही आवश्यक आहेत.

पृष्ठ क्र. ३० The empirical situation in knowledge demands, the distinction of three factors Cogniser, Cognition and Object cognised, does not offer a satisfactory explanation.

The problem is inexplicable on the level of 'relative experience', when this level is transcended in the plenary non-dual experience, there is no longer any problem to be solved.

पृष्ठ क्र. ३१ Mathematics and Logic are mainly the system of truth of human reason; and the natural sciences are mainly the depository of the 'Truth' of senses.'---

K.W. Wild यांनी हा सगळा प्रयत्न बघून त्याचा गोषवारा असा मांडला - 'The intution gives us insight into reality as opposed to, or supplementing appearances--

That (special forms of) intution is an <u>endowment</u> of specially gifted people'' (k.w. wald intution - cambridge university press - 1938 pp. 226)

भारतीय संस्कृतीतील उत्तर डॉ. राधाकृष्णन "Civilization must live on the lines of their own experience, culture is tradition and tradition is memory."

**सप्टेंबर २००५** (पान ७ - १३)

पृष्ठ क्र. ७ कार्ल मार्क्संचा अभ्यास भारतीय ज्ञान पद्धती. नाथपंथीय दृष्टिकोन योगिक दृष्टिकोन

पृष्ठ क्र. ८ मानव एक घटक-अभ्यास 'पिंडी ते ब्रह्मांडी'

पृष्ठ क्र. ९ मानवी सृजनशक्तीचे स्वातंत्र्य

पृष्ठ क्र. १० अरविंद घोष यांचे भाष्य "Every standpoint every man made rule of action, which ignores 'the invisible totality' of the cosmic movement', whatever its utility in external practice in the eye of 'spiritual Truth an imperfect view and law of ignorance"

पृष्ठ क्र. ११ संस्कृतीच्या उंचीचे ज्ञानेश्वरी प्रमाण वैश्विक अग्निची कामगिरी - १६ संस्कार क्रिया

पृष्ठ क्र. १२ नैतिकता व संस्कृतीचे पिरॅमिड Rebirth, Rawlsion Equity

आता थोडे लक्षात आले असेल की संस्कृतीचा अभ्यास हा गहन विषय आहे. शिवाय 'भारतीय संस्कृती' च्या जडण घडण ह्या व्यापारात जो शोध घेतला गेला आहे,

त्याची व्याप्ती फार मोठी आहे. ह्या विश्वाचे गूढ व स्वत:च्या अस्तित्वाचे गूढ आपल्या मर्त्य, तोकड्या व सीमित बुद्धीच्या सामर्थ्यावर घेताना. ह्या भारत भूमीवर जो एक ह्या शोध विचारांचा ठेवा तयार झाला तो एक रम्य व कौतुकास्पद लढाच आहे. हा लढा पुढे नेणारा मानवी समाज एका सांस्कृतिक बैठक वा चौकट किंवा पथदर्शकावर वाटचाल करतो आहे, ती संस्कृती विलक्षण सामर्थ्यशाली ठरली आहे.

मी घेत असलेला आढावा ह्या संस्कृतीच्या लढ्याच्या खाणाखुणा दाखवेल. अजूनही ह्याचा पुढचा भाग उत्तरार्ध लिहावयाचा आहे.

पण, हेही नसे थोडके. कदाचित, भविष्यात खुद्द विश्वनिर्माता सुद्धा ह्या सांस्कृतिक लढ्याचे कौतुक करील.

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अम्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## महाराष्ट्रातील प्रमुख पर्वतशिखरे

| पर्वत शिखर | स्थान | उंची मीटरमध्ये |
|---|---|---|
| १. कळसूबाई | सह्याद्री-अहमदनगर | १६४६ |
| २. साल्हेर | सह्याद्री-नाशिक | १५६७ |
| ३. महाबळेश्वर | सह्याद्री-सातारा | १४३८ |
| ४. हरिश्चंद्रगड | सह्याद्री-अहमदनगर | १४२४ |
| ५. तोरणा | सह्याद्री-पुणे | १४०४ |
| ६. इरूली | सह्याद्री-पुणे-सातारा | १३७३ |
| ७. अस्तंबा डोंगर | तोरणमाळ-धुळे | १३२५ |
| ८. शिंगी | सह्याद्री-पुणे-रायगड | १२९३ |
| ९. नाणेघाट | सह्याद्री-पुणे | १२६४ |
| १०. मकरंदगड | सह्याद्री-सातारा | १२३९ |
| ११. चिखलदरा | सातपुडा-अमरावती | १२०० |

*दिशा संपर्क दूरध्वनी*
*२५४२६२७०*

*हे ईश्वरा, सर्वांना सुखात, आनंदात ठेव. त्यातच माझे सुख सामावले आहे.*

*- एक प्रार्थना.*

# पालकनीती

*मनाच्या ओल्या मातीवर, मनाच्या कोऱ्या पाटीवर कोरडे ओढू नका- संपादक*

रोजच्या शिरस्त्याप्रमाणे मी जवळच्याच सोसायटीतल्या माझ्या मैत्रिणीला तळ्यावर फिरायला जायला बोलवायला म्हणून गेले. शोभनाताईंनीच दार उघडलं 'बसा म्हणाल्या, येतेच मी', ''ईशा तू जाऊ नको बाहेर आजीकडे कोणीतरी आलंय. तू अभ्यास कर तुझा. दू यूवर होमवर्क फर्स्ट. फ्रॉम थ्री ओ क्लॉक तू अभ्यासाला बसली आहेस. हरी अप. आता ऐकतेस की मार हवाय.'' कोणाचा तरी, बहुधा त्यांच्या सुनेचाच रागावण्याचा आवाज. पाठोपाठ मारण्याचा रडण्याचा आवाज आला. 'आजी अे आजी आत ये ना, मम्मा मारतेय' छोट्या नातीचा रडत रडत बोलण्याचा आवाज. ''अग ईशा डोन्ट क्राय स्पीक लाऊडली. अद्वैत झोपलाय. आणखी मार बसेल हं ऐकलं नाहीस तर, फार लाडावलीय. दिवसभर हुंदडायचं नाहीतर टी.व्ही. बघायचा. संध्याकाळी स्वीमिंगला जायचय नं! आटप लवकर.'' ''अग किती मारतेस पोरीला सटासट नि तेही कानशीलात! लहान आहे ती. अभ्यास सांग करायला पण एवढं मारायचं?'' गालं चोळत रडणाऱ्या ईशाला शोभनाताई जवळ घेतात. 'उगी बाळ, करून टाक अभ्यास बेटा, मार नको खाऊस.'' आजीला चिकटलेल्या ईशाला सून खसकन् ओढून काढते. ''नाटकं नकोत रडण्याची. अभ्यास नको करायला. परवा परीक्षा आहे ना ॲबॅकसची! त्याचा अभ्यास कोण करणार?'' अजून सटासट मार मिळतो. पोर कळवळून रडते. शोभनाताईंच अंत:करण दुखावतं. 'अग मारायचं तर पाठीत मार केवढसं लेकरू ते सिनियर के. जी. तलं. किती त्याला मारायचं! मला बघवत नाही. मी जातेच कशी बाहेर'' शोभनाताई बाहेर वळतात. मी न रहावून दारातून सर्व पाहिलेलं असतं.

आम्ही दोघी बाहेर पडतो. शोभनाताई डोळे पुसतात. ''मला नाही बाई बघवत येवढं लेकराला मारलेलं. आमची ईशाही हट्टी आहे, हूड आहे. पण स्वाभाविक आहे. वय काय हो तिचं! नि किती अपेक्षा करायच्या एवढ्याशा मुलीकडून! मला वाईट वाटतं. मी मुलाला म्हटलं, ती तापट आहे ना तर तू तरी शांत रहा. दोघं मारू नका तिला. तिला प्रेमानं समजावून सांगा. रागवा, शिक्षा करा पण असं सारखं मारू नका. मारून थोडीच मुलांना वळण लागतं! शिस्त हवी, धाक हवा पण सारखं मारू नका. मारण्यानं ती कोडगी तरी होतील. नाहीतर अभ्यासाचा धसका घेतील. आम्ही नाही आमच्या मुलांना मारलं. मारणं हा उपाय नाही त्यावरचा.'' पार्कच्या गेटच्या आत शिरून आम्ही दोघी तळ्याच्या कठड्यावर बसलो.

''तुम्ही म्हणता ते खरं आहे शोभनाताई. माझी सून त्यामानानं शांत आहे. रागावते पण मारत नाही मुळीच. तसा शनिवार रविवारीच तिला वेळ मिळतो अभ्यास घ्यायला. एरवी ती कामावरून आल्यावर स्वैपाकपाणी, जेवणं खाणं, मागची आवराआवर होईपर्यंत आमचा शुभम् टी. व्ही. पुढे बसलेला असतो. तो ही ईशाहून वर्षभरानेच मोठा असेल. सगळीच जेवणी खाणी टी. व्ही. पुढे चाललेली असतात. मग काहीतरी जेमतेम पाऊण एक तास अभ्यास. तशी हल्ली मुलं तरी कुठे लवकर झोपतात! त्यांची शाळा दुपारची असते. त्यामुळे सकाळी ह्या दोघांची घाई. जायच्या आधी ती त्याला अभ्यासाला बसवून जाते.''

''सुमनताई आमची सूनबाई पण जात होती कामावर पण अद्वैत झाल्यावर सोडली तिनं नोकरी. नि म्हणते बरं

केलं. गरज नसेल तर हवी कशाला तो वखवख नि धावपळ. लहान मुलांना आई घरी असली की किती आवडतं. घरालाही घरपण येतं. मुलांवर चांगले संस्कार होतात. आता गरज असेल तर गोष्ट वेगळी. पण आता घरी असते तर अद्वैतकडे बघा, घरातलं बघा, स्वैपाकपाणी, यामुळे थकत असेल नि मग सारा तो राग ईशावर निघतो अभ्यास करतांना. कधी कधी मला वाटतं सासू वरचा राग तर काढत नाही ना मुलीवर! अहो रागाच्या भरात एक दोनदा तर सरळं तिला ढकलून दिलं. शोकेसवर आपटली जाऊन ती. लागलं बिचारीच्या डोक्याला. कितीदा तिचे केस धरून ओढते. एकदा तर कानपटात मारलं तिच्या भिंतीवर आपटली.''

''हो मी पाहिलं ना आता तुमच्या घरी. एवढं नको चिडायला नि रागवायला तुमच्या सुनेनं. जरा मोठी झाली की कळेल आपोआप तिला. मग करेल आपला आपला अभ्यास.''

''मी पण तेच म्हणजे तिला. नेमकं जेवायच्या वेळी तिला रागावायचं नि मारायचं मग कशी जेवेल ती पोरं! मी तिला बोलवायला गेले तर म्हणाली ''मम्माचा मार खाऊन पोट भरलंय माझं'' एवढं मारायचं नि मग समोर ताटात श्रीखंड पाळी ठेवली तर ती गोड लागणार आहे का?''

''तुम्ही म्हणता ते सगळं बरोबर आहे. पण आजकाल सर्वच क्षेत्रात एवढी स्पर्धा वाढलीय. नि त्या स्पर्धेत जिंकण्यासाठी त्या रेसमध्ये धावण्यासाठी आपल्या मुलानं फीट असावं म्हणून पालकांची एवढी धडपड आटापिटा चाललेला असतो. ''पण आपल्या पाल्याचा कल नको का पाहिला? त्याला कशाची आवड आहे? कुठल्या क्षेत्रात तो जास्त हुशार आहे हे नको का पाहायला? आपलं उठ सुठ धर की मार. मुलं आपली हक्काची आहेत. म्हणून बदडायचं की काय त्यांना! ती बिचारी लहान तुमच्यावर सर्वस्वी अवलंबून आहेत म्हणून!''

''शोभनाताई, ''तारे जमीं पर'' पाहिला का तुम्ही! जरूर सर्वांनी पहा. त्यात हेच सर्व सांगितलंय शोभनाताई''

''मी तर त्यांना म्हटलं तुम्ही तिघं जा पाहयला मी अद्वैतला सांभाळीन, पण अजून मुहूर्त नाही लागला पाहाला.''

वरच्या या दोघींच्या संवादातून जे ऐकलं त्यावरून वाटतं की शाळेत शिक्षकांनी मुलांना मारायचं नाही असा कायदा करायचा. मग ह्या पालकांना कोणता कायदा लागू करायचा नि कोणी की मुलांना मारू नका म्हणून! त्यांच्या छोट्या छोट्या चांगल्या गोष्टींचं कौतुक करा. त्यांनी एखादंही गणित बरोबर केलं. अक्षर चांगल काढलं की त्यांना शाबासकी द्या. त्यांना प्रोत्साहित करा. 'तुला पण येतं, जरा प्रॅक्टीस कर की तुला सुद्धा येईल.' नेहमी सकारात्मक बोला. तुला येणारच नाही, जमणारच नाही म्हणू नका. गीतेच्या सहाव्या अध्यायात सहाव्या श्लोकात भगवान श्रीकृष्णानेही हेच सांगितले आहे -

बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जित:।

अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६.६

जो स्वत:बद्दल सकारात्मक विचार करतो (मला हे येणारच, येईलच असा' तो स्वत: स्वत:चा मित्र, बंधू, सखा बनतो नि जो स्वत:बद्दल नकारात्मक विचार करतो (मला हे येणारच नाही, जमणारच नाही असा) तो स्वत: स्वत:चा शत्रू होतो.

म्हणून मुलांना सारखं रागावू नका. हिडीस फिडीस करू नका. त्यांचा स्वाभिमान जपा. कोणासमोर त्यांना रागावलं, मारल तर त्यांना तो अपमान वाटतो असं करू नका. जेव्हा ती मुलं काही चांगलं करतील तेव्हा त्यांना प्रेमानं जवळ घ्या. पाठीवरून हात फिरवा. शाबासकी द्या. स्पर्शातून तुमचे प्रेम व्यक्त करा. म्हणजे आई बाबा आपल्या पाठीशी आहेत. ते आपल्यावर खूप प्रेम करतात, हा विश्वास त्यांच्या मनात निर्माण होईल. कोवळ्या वयात जशी त्यांना शिक्षकांची भीती वाटायला नको तशी पालकांचीही. आदर

---

*कोणत्याही आंदोलनाचे यश त्याला लाभलेल्या बौद्धिक नेतृत्वाच्या क्षमतेवर ठरते.*

युक्त प्रेम त्यांना शिक्षकांविषयी व पालकांविषयी वाटायला हवे. तसे ते वाटेल जर दोघांनी शिक्षक व पालकांनी आपापल्या भूमिका योग्य तऱ्हेने निभावल्या तर! त्या तशा त्यांनी निभवायला हव्यातच. तरच ह्या देशाच्या भावी पिढीचे भविष्य उज्ज्वल ठरेल. म्हणतात ना -

पंचवर्षानि लालयेत, दशवर्षानि ताडयेत। (पण बेताने)

प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्र वदाचरेत॥

वरील सुभाषित पालकांनी लक्षात ठेवावे. अति लाडही नकोत तसा अति मारही नकोच. 'अति सर्वत्र वर्ज्य-येत' प्रत्येक बाबतीत तारतम्य बाळगावे. सारखं धारेवर धरू नये. काही नीती नियम त्यांनीही पाळायला हवेत.

''तुला कितीवेळा सांगायचं! समजतं की नाही तुला! मूर्खच आहेस, वेडीच आहेस.'' असं सारखं सारखं म्हटलं की बाल मनावर त्याचा खोलवर परिणाम होतो. 'आजी मी तर वेडीच आहे शहाणी कुठाय?' असं शोभनाताईंच्या ५ वर्षाच्या नातीनंच त्यांना विचारलं नि खूप रडायला लागली ती. तिची खूप समजूत घातली. 'कोण म्हणतं तू वेडी आहेस? तू तर शहाणी मुलगी आहेस. माझी लाडकी आहेस. तू कधीतरी वेड्यासारखं वागली असशील म्हणून मम्मा म्हणाली असेल माझी बाळ शहाणी गुणाची आहे.'' आजीनं तिला जवळ पोटाशी धरलं तरी कितीवेळ हुंदक्यांनी हमसून हमसून रडत होती ती. मुलांना असं खच्ची करू नका. त्यांच्यात न्यूनगंड निर्माण करूं नका. आत्मविश्वास निर्माण करा. नाहीतर जगाशी दोन हात करायला, मुकाबला करायला, मुलं घाबरतील, कचरतील, दुबळी - कमकुवत ठरतील. गीतेचा श्लोक व सुभाषित वर दिले आहे त्याप्रमाणे स्वत: जसं स्वत:चं मित्र बनायचं तसं तुम्ही मुलांचे मित्र बना. त्यांचाही त्यांच्या मित्रांसमोर, बाहेरच्या लोकांसमोर अपमान करू नका त्यांना मारू नका. रागाच्या भरात कधी चुकून वड्याचे तेल वांग्यावर काढलं गेलं, तर मुलाला सॉरी म्हणा त्याला प्रेमानं जवळ घ्या. 'ए गडबड करू नका' म्हणून वस्सकन ओरडण्यापेक्षा 'जरा शांत बसा बरं, हाताची घडी तोंडावर बोट' गोड बोलूनही तोच परिणाम साधता येईल. मग तुमच्या छकुलीला म्हणायची वेळ येणार नाही. 'मारू नको ग, मी केले काय तरी ग।''

''मातृ देवो भव। पितृ देवो भव।आचार्य देवो भव।''

हे त्यांना शिकवायचं तर तसं आचरण पालक म्हणजे माता पिता व आचार्य म्हणजे शिक्षकांनी ठेवायला नको का? अर्थात हवचं, ती त्यांची नैतिक जबाबदारी आहे.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अपार्टमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

उदात्त गोष्टींवर वीट येणे हे क्षुद्र मनोवृत्तीचे लक्षण आहे.

# पूर्वजन्मातले संचित

*पूर्वजन्मातले संचित कोणाला चुकले आहे? या जन्मातल्या जगण्यावर या संचिताचा परिणाम होतच असतो - संपादक*

पुनर्जन्म आहे किंवा नाही हा एक वादाचा विषय असला तरी मागील जन्माचे संस्कार मात्र वर्तमान जन्मात माणसामध्ये नक्कीच दिसून येतात. तीन-चार वर्षांचा मुलगा भगवद्गीतेचे अध्याय म्हणतो, आगदी लहान वयातच काही मुले शुद्ध इंग्रजी बोलताना दिसून येतात, तसेच काही व्यक्ती तर पुढील दहा वर्षानंतर येणाऱ्या पहिल्या तारखेला कोणता वार येणार हे एका क्षणात सांगू लागतात. या सर्वांना पुनर्जन्माचे संचित संस्कारच म्हणावे लागेल. कार्यालय, कंपन्या किंवा वेगवेगळे उद्योगधंदे यामध्ये सांघिक स्वरूपाचे काम चाललेले असते. अशा ठिकाणी अनेक व्यक्ती एकत्र येऊन काम करीत असतात. त्याठिकाणी अनेक वादात्मक प्रसंगाना सामोरे जावे लागते. काही कर्मचारी एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी जाणून बुजून वादात्मक प्रसंग निर्माण करीत असतात. एकमेकांना भडकवण्यात त्यांना आनंद वाटत असतो. काट्याने काटा कसा काढावा किंवा दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून कसा नेम साधावा यातच ते धन्य मानतात. अशावृत्तीचे लोक नारदमुनींच्या वंशावळीचे असावेत असेच वाटते. अशा प्रकारचा आनंद क्षणिक असतो, तो फार काळ टिकणारा नसतो हे त्यांच्या लक्षात येत नसते. आपण जे काही कर्म करतो त्याचे फळ आपणास मिळतच असते. काही कर्मांचे फळ तावडतोब मिळते तर काही कर्मांचे फळ थोडे उशिरा मिळते. पण मिळते हे मात्र नक्की. गुन्हा करणारी व्यक्ती एखाद्या मानवी प्रयत्नामुळे काही काळापुरती सुटू शकते पण निसर्गनियमापुढे तिचे काही चालत नाही. निसर्गनियम अशा व्यक्तींना शिक्षा करतो म्हणजे करतोच. निसर्गानियमापासून कोणीही सुटू शकत नाही. पुढील उदाहरणाच्या साहाय्याने आपणास हे अधिक स्पष्ट करता येईल. कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी कारण नसतांना एखाद्या कर्मचाऱ्यावर तसाच राग सहन करतो पण मनात मात्र राग असतो. राग कोठे तरी काढल्याशिवाय मन हलके होत नाही म्हणून तो कर्मचारी घरी आल्यानंतर कारण नसताना आपल्या पत्नीवर राग काढतो. पत्नी विचार करते की, आपली काही चूक नसताना आपल्याला आज ओरडा का मिळाला? त्यामुळे ती बेचैन होते. पतीचा मान राखावा म्हणून ती राग सहन करते. आलेला राग तीही कारण नसताना आपल्या मुलावर काढते. तो मुलगाही विचार करतो की, आपली काही चूक नसताना आईने आपणास मार का दिला? याचाही राग त्या लहान मुलास आलेला असतो. आईचा मान राखावा म्हणून तो मुलगा तसाच राग सहन करतो. पण त्याचा राग त्यालाही शांत बसू देत नाही. शेवटी तो मुलगा आपला राग घरातील मांजराला लाथ मारून काढतो. मांजरालाही वाटते की मी शांत बसलो असताना त्याने मला लाथ का मारली? म्हणून ते मांजरही बेचैन होते. काही दिवसानंतर त्या कर्मचाऱ्याच्या घरी एका कार्यक्रमाचे आयोजन केलेले असते. कार्यालयीन सहकारी आणि वरिष्ठही त्या कार्यक्रमाला आलेले असतात. कार्यक्रम व्यवस्थित पार पाडला जातो. शेवटी निरोप घेऊन सर्वजण परत निघतात. दरवाज्याच्या बाहेर पडत असतांना त्या साहेबांचा पाय तेथे बसलेल्या मांजराच्या शेपटीवर पडतो आणि ते मांजर त्यांच्या पायाचा चावा घेते. अशापद्धतीने त्या साहेबाला त्याच्या वर्तणुकीचे / कर्माचे फळ मिळते.

ज्या ठिकाणी अनेक व्यक्ती एकत्र काम करतात त्या ठिकाणी वादविवाद होणारच. कारण तेथे काम करणारे सर्व कर्मचारी सारख्या विचारांचे नसतात. प्रत्येकावर वेगवेगळे

संस्कार झालेले असतात. एखादी व्यक्ती आपणास वाईट बोलली किंवा तिने अपशब्द वापरला म्हणून आपण आपला आनंद का म्हणून घालवायचा? त्यामुळे आपला वर्तमान खराब का करायचा? त्या व्यक्तीवर तशाप्रकारचे संस्कार झालेले असतात. एकप्रकारे तो आपल्या स्वत:चा, त्याच्या कुटुंबाचा त्याचबरोबर संपूर्ण खानदानाचा परिचय करून देत आहे असे समजून त्याकडे दुर्लक्ष करावे. त्यामुळे आपल्या मनावर परिणाम करून आपण आपली प्रगती थांबवू नये. घडलेल्या प्रसंगावर मात करून पुढे गेले पाहिजे. संकटे नेहमी माणसाची परीक्षा घेण्यासाठीच येत असतात. अशा परीक्षेला धैर्याने तोंड दिले पाहिजे. त्यामध्ये नापास होऊन चालत नाही. हीच आपल्या बौद्धिक कसोटीची खरी परीक्षा असते.

एखाद्या व्यक्तीचा पूर्वजन्म कुत्र्याचा असेल तर त्याचे संचित संस्कार या जन्मी त्याचप्रकारचे दिसून येतात. दुसऱ्यांना चावणे हाच गुणधर्म कुत्र्याचा असतो. समोरील व्यक्ती कोण आहे हे पाहून तो चावत नसतो. डॉक्टर, वकील, मंत्री, गुरु यातील फरक त्याला कळत नसतो. दुसऱ्यांना चावणे एवढेच त्याला माहीत असते. मग अशाप्रकारच्या पूर्वजन्म संस्कारित माणसामुळे आपण आपला वर्तमानकाळ का खराब करून घ्यायचा? नारदमुनीच्या वंशावळीचे जे लोक असतात त्यांना अशा माणसांचीच खरी गरज असते. अशा वृत्तीच्या माणसाची संगत त्यांना हवी असते. एक कुत्रा मध्यरात्री भुंकत असतांना त्याच्या जोडीला अनेक कुत्री येऊन भुंकत असतात. पहिला कुत्रा का भुंकतोआहे, त्याला काय दिसले हे जाणून घेण्याचा प्रयत्न इतर कुत्री करीत नाहीत. कारण त्यांच्यात विचार करण्याची कुवतच नसते. केवळ पहिल्या कुत्र्याला साथ द्यायची म्हणून साथ देत असतात. पहिल्या कुत्र्याला साथ देणाऱ्या इतर कुत्र्यांपैकी काही कुत्र्यांना अकारण शेवटी रडावे लागते. हे आपण अनेकवेळा पहातो. शेवटी निष्कर्ष काय? तर काहीच नाही. कारण त्या ठिकाणी काहीच घडलेले नसते. गाढवाचेही असेच असते. आपण गाढवाजवळ गेलो तर आपली काही चूक नसतानाही ते लाथ मारते. कारण लाथ मारणे हा त्या गाढवाचा गुणधर्मच असतो. म्हणून गाढवाच्या किती जवळ जायचे हे प्रत्येकाने ठरवायला पाहिजे.

एकदा गौतम बुद्ध शांत बसले होते. त्यांना राग कसा येत नाही हे पहाण्यासाठी एक व्यक्ती त्यांच्याजवळ आली आणि मोठमोठ्याने शिव्या देऊ लागली. मोठ्याने शिव्या देत असतानांही गौतम बुद्ध मात्र शांत बसून होते. ते काहीच बोलत नव्हते. फक्त त्या शिव्या देणाऱ्या व्यक्तीकडे पहात होते. समोरच्या व्यक्तीला वाटले आपण एवढ्या शिव्या देत असूनही गौतम बुद्धांना याचे काहीच कसे वाटत नाही. ते एवढे शांत कसे आहेत. त्या व्यक्तीला आश्चर्य वाटले म्हणून त्यांनी बुद्धांना विचारले, 'बुद्ध मी तुम्हाला एवढ्या शिव्या देत असतांना तुम्ही शांत कसे? तुम्हाला काहीच कसे वाटत नाही?' त्यावर बुद्ध म्हणाले, 'ज्यावेळी तुम्ही एखादी वस्तू दुसऱ्याला देता आणि ती वस्तू दुसऱ्या व्यक्तीने घेतली नाही तर ती वस्तू कोणाजवळ रहाते? ती वस्तू तुमच्या जवळच असते.' त्यावेळी त्या व्यक्तीने बुद्धाचे पाय धरले आणि त्यांची माफी मागितली म्हणून आपणही दुसऱ्याच्या वाईट शब्दाने अपमानित होऊन मनावर परिणाम करून घेऊ नये. आपण आपले कार्य नित्य करीत रहावे. आलेल्या प्रसंगाला धैर्याने तोंड देऊन विजय मिळवला पाहिजे. जर आपल्यावर कोणी रागावले तर त्या रागावर योग्य ते नियंत्रण ठेवले पाहिजे. कारण शेवटी विजय सत्याचाच होतो.

**श्री. यशवंत माने**

अबोली, बी - १०२,
सुभाष रोड,
कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.),
जि. ठाणे

●●●

*खिडकी उघडल्याशिवाय सूर्योदय झालाय हे कळत नाही.*

# व्यवस्थापनशास्त्रातील पाच 'स' कारांचे ग्रंथालयात उपयोजन

व्यवस्थापन शास्त्रातील अनेक तत्त्वांचे ग्रंथालयात उपयोजन केले जाते. त्यातील पाच 'स' कारांचा हा परिचय - संपादक

**प्रास्ताविक :**

सुसंबद्ध व सुरचित नियोजन हे व्यवस्थापनाचे एक प्रमुख अंग आहे. कोणत्याही ग्रंथालयाचे तर ते व्यवच्छेदक लक्षण आहे. प्रगतीचा तो मूलमंत्र आहे. माहितीच्या विस्फोटाच्या युगात तर व्यवस्थापनाला लक्षणीय महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यवस्थापनशास्त्रामध्ये पौर्वात्य व पाश्चिमात्य विचारवंतांनी विशेष चिंतन व मनन केले आहे. जपानी व्यवस्थापन तज्ज्ञांनी त्यात उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

**व्यवस्थापनातील पाच 'स' :**

व्यवस्थापानशास्त्रात संशोधन करताना जपानी शास्त्रज्ञांनी त्यातील क्लिष्टता काढून टाकण्याचा प्रयत्न केला. सोप्या भाषेत विचार मांडले तर लोकांकडून ते चटकन उचलले जातात, हे त्यांच्या लक्षात आले. 'प्रत्येक वस्तूसाठी जागा आणि प्रत्येक वस्तू आपल्या जागेवर' या एका वाक्यात त्यांच्या व्यवस्थापनाचे सार सामावलेले आहे. आपल्या व्यवस्थापनशास्त्रात सोपेपणा आणताना त्यांनी काही कळीचे शब्द (Key Words) तयार केले. ते इंग्रजी एस (S) या अक्षरापासून तयार होत असल्याने त्यांना व्यवस्थापनातील पाच 'स' कार (Five 'S's in Management) म्हणतात. ते पाच 'स' असे आहेत -

**१) सैरी (Seiri) :**

याचा अर्थ वर्गवारी. यात गरज नसलेल्या वस्तू गरजेच्या वस्तूंपासून अलग ठेवण्यावर भर दिलेला असतो. प्रत्येक वस्तूचा चार घटकांमध्ये वर्गवारी करता येते. आकृती क्र. १ पहा.

| | आवश्यक | अनावश्यक |
|---|---|---|
| कार्यरत | कार्यप्रवण | राखीव |
| कार्यहीन | दुरूस्ती | भंगार |

**(आकृती क्र. १ : वस्तूंची वर्गवारी)**

अ) पहिल्या वर्गवारीत आवश्यक (Required) आणि कार्यरत (Working) अशा वस्तूंचा समावेश होतो. या वस्तू कार्यप्रवण (Continue for work) ठेवल्या जातात.

आ) दुसऱ्या वर्गवारीत अनावश्यक (Not required) पण कार्यरत अशा वस्तूंचा समावेश होतो. या वस्तू आपत्कालीन गरज म्हणून राखीव (Reserved) ठेवल्या जातात.

इ) तिसऱ्या वर्गवारीत आवश्यक, पण कार्यहीन (Not working) अशा वस्तूंचा समावेश होतो. या वस्तू त्वरित दुरूस्तीसाठी (Repair) पाठवल्या जातात.

ई) चौथ्या वर्गवारीत अनावश्यक व कार्यहीन वस्तूंचा समावेश होतो. या वस्तू त्वरित भंगारात (Scrap) काढल्या जातात.

**२) सैटन (Seiton) :**

याचा अर्थ पद्धतशीर मांडणी. यामुळे वस्तू योग्य त्या जागी हवी तेव्हा सापडते. उपलब्ध जागेचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करून घेता येतो.

*लोक भांडतात, कारण ते आपली बाजू मांडू शकत नाहीत - जी. के. चेस्टरटन*

३) सैसो (Seiso) :

याचा अर्थ नियमित स्वच्छता. याचा अर्थ कोणतीही वस्तू नियमित साफ केली, तिला तेलपाणी केले तर याचा परिणाम ती जास्त कार्यक्षम होण्यात व तिचे आयुष्य वाढण्यात होतो.

४) सैकेत्सु (Seiketsu) :

याचा अर्थ नियमावली. वस्तूच्या वापरासाठी काही नियम तयार केले, काही शिस्त अंगी लावून घेतली, तर तिची उपयुक्तता वाढते.

५) शित्सुके (Shitsuke) :

याचा अर्थ स्वयंशिस्त. कोणत्याही आस्थापना अथवा संस्था यात वावरताना किंवा काम करताना प्रत्येकाने स्वयंशिस्त अंगी बाणवून घेतली, तर कोणतेही कार्य (Task) खंड न पडता पूर्ण होईल.

फायदे :

पाच 'स' कारांचे अनेक फायदे आहेत. वेळेची व पैशाची बचत हा प्रमुख फायदा. श्रमविभागणीमुळे एकावरच कामाचा बोजा राहात नाही. प्रत्येकाचा यशात सहभाग. त्यामुळे संस्थेची जवळीक (Attachment) वाढते. दर्जा उंचावतो. आत्मविश्वास वाढतो. उत्पादनखर्च कमी होतो. परिणामी नफ्यात वाढ होते.

ग्रंथालयात उपयोजन :

ग्रंथालय ही एक सेवा देणारी संस्था आहे. साहजिकच तिलाही व्यवस्थापनाचे नियम लागू होतात. पाच 'स' कारांचा ग्रंथालयातही वापर करता येऊ शकतो.

१) सैरी (Seiri) :

वर्गवारी हा तर ग्रंथालयाचा प्राणच आहे. वर्गीकरण हे ग्रंथालयशास्त्रातील एक प्रमुख अंग आहे. ग्रंथवर्गीकरणाबरोबर सीडी, ध्वनिफीत, चित्रफीत, नकाशे, नियतकालिके, वृत्तपत्रे यांची सुव्यवस्थित वर्गवारी करावी. तसेच रद्दबातल केलेली पुस्तके, जुने अंक, दुर्मिळ ग्रंथ, विशेष महत्त्वाचे ग्रंथ यांचे सुयोग्य वर्गीकरण करून मांडणी केल्यास त्यांची मागणी वाढते.

| | आवश्यक | अनावश्यक |
|---|---|---|
| कार्यरत | मागणी असलेले ग्रंथ, नवा अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके | जुन्या आवृत्या, जुना अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके. |
| कार्यहीन | पाने नसलेली, जीर्ण, फाटलेली | बंद झालेल्या अभ्यासक्रमातील खराब पुस्तके |

(आकृती क्र. २ - ग्रंथालयातील ग्रंथांची वर्गवारी)

ग्रंथालयातील ग्रंथांची चार घटकांमध्ये वर्गवारी करता येते. (आकृती क्र. २ पहा.)

अ) पहिल्या वर्गवारीत चांगल्या स्थितीतील मागणी असलेले ग्रंथ ठेवले जातात.

आ) दुसऱ्या वर्गवारीत फारशी मागणी नसलेले, परंतु सुस्थितीतील ग्रंथ संदर्भासाठी राखून ठेवले जातात.

इ) तिसऱ्या वर्गवारीत मागणी असलेल्या, पण जीर्ण व फाटक्या ग्रंथांचा समावेश होतो. अशा ग्रंथांची त्वरित पुनर्बांधणी केली जाते किंवा जादा प्रतींसाठी मागणी नोंदवली जाते.

ई) चौथ्या वर्गवारीत मागणी नसलेल्या व खराब पुस्तकांचा समावेश होतो. अशी पुस्तके रद्दबातल करून विकून टाकतात.

२) सैटन (Seiton) :

ग्रंथालयातील ग्रंथांची पद्धतशीर मांडणी केलेली

असावी. त्यासाठी मान्यताप्राप्त वर्गीकरण पद्धतीचा अवलंब करावा. मुक्तद्वार असल्यास वाचकांकडून पुस्तक बऱ्याचदा चुकीच्या ठिकाणी ठेवले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे ग्रंथालयीन सेवकांनी काळजी घेऊन ते पुस्तक योग्य जागी ठेवले जाईल हे पहावे.

**३) सैसो (Seiso) :**

धूळ हा तर ग्रंथांचा मुख्य शत्रू आहे. त्यामुळे ग्रंथालयात नियमितपणे स्वच्छता केली गेली पाहिजे. त्यामुळे ग्रंथांचे आयुष्य वाढते. वातावरण प्रसन्न होते. तसेच इतरत्र ठेवले गेलेले पुस्तक हाती सापडून ते जागच्या जागी ठेवता आल्याने 'सेटन' च्या घटकाचेही पालन होते.

**४) सैकेत्सु (Seiketsu) :**

ग्रंथालयातील ग्रंथ वापराबाबतचे नियम करून ते नीट दिसतील अशा ठिकाणी टांगून ठेवावेत. ग्रंथ किती दिवस वाचक स्वत:जवळ ठेऊ शकतो, दंडाच्या रकमेचा तपशील, कामकाजाच्या वेळा, सुट्यांचे दिवस वगैरे माहिती सुयोग्य प्रकारे प्रदर्शित (Display) करावी.

**५) शित्सुके (Shitsuke) :**

स्वयंशिस्त हे यशाचे कारण आहे. एखादा कर्मचारी न आल्यास तो विभाग बंद ठेवणे हे बरोबर नाही. दुसऱ्या कर्मचाऱ्याने स्वत:च पुढाकार घेऊन तो विभाग सांभाळला पाहिजे. नाहीतर वाचकांची नेहमीच गैरसोय होऊन तो ग्रंथालयात येण्याचे टाळू लागेल. तसेच, ग्रंथालयात वेळेवर येण्याची स्वयंशिस्त प्रत्येक कर्मचाऱ्याने लावून घेतली पाहिजे.

**सारांश :**

व्यवस्थापन शास्त्रातल्या पाच 'स' कारांनी मोठे लक्षणीय बदल घडवून आणले आहेत. अनेक छोट्या छोट्या गोष्टी एक मोठे कार्य यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. ग्रंथालयशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र यांचा अगदी जवळचा संबंध आहे. व्यवस्थापनशास्त्रातील पाच 'स' कारांचे ग्रंथालयात उपयोजन केल्यास अधिक कार्यक्षमपणे सेवा देता येईल. तसेच, डॉ. रंगनाथन यांच्या पाच सिद्धांतांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येणे, सहज शक्य आहे.

**संदर्भ :**

१) देशमुख, मंगेश, शिखर यशाचे, आ. २, पुणे : सुरेशचंद्र, ऑक्टो. २००६, पृ. २०८

२) राशिंगकर, सुधीर, विकासासाठी जपानची ५ - एस तत्त्वप्रणाली, समाविष्ट उद्योजक, संपा. किरण कुलकर्णी, खंड - १९, अंक - ३, मार्च २००९, पृ. १७-२०.

**प्रा. श्रीनिवास मेध:श्याम आठल्ये** (ग्रंथपाल)

स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
छत्रपती भवन, आयरे मार्ग, दत्तनगर,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१.
भ्रमणध्वनी- ९२२४७३४०३८

●●●

**दिशासाठी**

आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे आपल्या अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.

तरी आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.

साहित्य - जगत

# गंगाजळीकार

**माजी ज्येष्ठ ग्रंथपाल श्री. श्री. बा. जोशी ('गंगाजळीकार') यांना मॅजेस्टिक प्रकाशनाचा 'ग्रंथोपासक' पुरस्कार :**

दि. ५ मे २००९ हा दिवस मराठी साहित्याच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिण्यासारखा आहे. मॅजेस्टिक प्रकाशनाच्या केशवराव कोठावळे स्मृती पुरस्काराचे हे २५ वे वर्ष. माटुंग्याच्या राम नारायण रुईया कॉलेजमध्ये एका हृद्य समारंभात ज्येष्ठ पत्रकार अरुण टिकेकर यांच्या हस्ते माजी ज्येष्ठ ग्रंथपाल व साहित्यिक श्री. श्रीकृष्ण बापूराव जोशी ('गंगाजळीकार') बडोदे यांना ग्रंथोपासक पुरस्काराने गौरविण्यात आले. आपल्या छोट्याशा भाषणात श्री. बा. जोशी म्हणाले, ''मला दिलेला 'ग्रंथोपासक' पुरस्कार मी स्वीकारतो. पण माझ्यापेक्षा अजूनही मोठमोठे ग्रंथोपासक आहेत. त्यांनाही या पुरस्काराने गौरविण्यात यावे वाचनसंस्कृती वाढविणारे सयाजीराव गायकवाड पदरमोड करून बाजारात येणाऱ्या वाचनीय पुस्तकांची यादी असलेली पत्रके महाराष्ट्रभर वाटणारे व विविध प्रकारे ग्रंथप्रसार करणारे डोंबिवलीचे शरद जोशी, तुटपुंज्या पगारातून ग्रंथ विकत घेऊन कोकणातल्या आपल्या गावी ग्रंथालय उभारणारे दत्तात्रेय गायकवाड आदींच्या कार्याचा उल्लेख त्यांनी केला. सूर्याप्रमाणे तळपणारे रथी महारथी असतांना माझ्यासारख्या रानफुलाला तुम्ही आपले म्हटले'' अशा शब्दांत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

'कॉलनी' (आत्मकथन) कार या सध्या विशेषत्वाने गाजत असलेल्या पुस्तकाचे लेखक सिद्धार्थ पारधे यांना साहित्यिक सुभाष भेंडे यांच्या हस्ते 'केशवराव कोठावळे' स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी श्री. पारधे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वश्री डॉ. अरुण टिकेकर, विजय कुवळेकर, डॉ. विलास खोले, डॉ. अनंत देशमुख यांचीही भाषणे याप्रसंगी झाली. सुरुवातीस अशोक कोठावळे यांनी प्रास्ताविक केले.

या कार्यक्रमात डॉ. विलास खोले संपादित 'केशवराव कोठावळे पारितोषिक ग्रंथ', सारंग दर्शने यांनी संपादित केलेल्या 'ग्रंथांच्या सहवासात' आणि श्री. बा. जोशी लिखित 'गंगाजळी-४' या उत्कृष्ट पुस्तकांचे प्रकाशन झाले. श्री. सारंग दर्शने आणि डॉ. विलास खोले या उभयतांनी त्यांनी संपादित केलेल्या पुस्तकांतून जे विवेचन केलेले आहे ते पुन्हा पुन्हा वाचण्यासारखे आहे. 'गंगाजळी-४' तर उत्तमच आहे. गेली ६ दशके अखंड वाचन-चिंतन-मनन व ग्रंथपालन करणारे श्री. श्री. बा. जोशी यांचे मराठी साहित्यासाठी दिलेले योगदान अपूर्व आहे. त्यांच्या 'गंगाजळी' चे पूर्वीचे तीनही खंड उत्तम आहेत. प्रत्येक वाचकाने ते खंड आपल्या संग्रही जरूर ठेवावेत.

'दोन लेखकांचे पुरस्कार आणि तीन उत्कृष्ट पुस्तकांचे प्रकाशन यामुळे मंगळवारी संध्याकाळी मॅजेस्टिक प्रकाशनातर्फे ग्रंथपंचमी साजरी करण्यात आली' असा या कार्यक्रमाचा सार्थ गौरव दै. लोकसत्तेने केला. मॅजेस्टिक प्रकाशनाच्या केशवराव कोठावळे स्मृती पुरस्काराचे हे २५ वे वर्ष. या २५ वर्षांत पारितोषिक मिळालेल्या २५ ग्रंथांचा नामवंतांनी करून दिलेला परिचय पारितोषिक प्राप्त लेखकाचा परिचय व या वर्षीच्या निवड समितीचा (डॉ. अनंत, देशमुख, सुनील कर्णिक, विजय तापस) आणि पूर्वीच्या निवड समितीचा सर्व पुस्तकांविषयीचा (९ पारितोषिक प्राप्त) अभिप्राय या केशवराव कोठावळे पारितोषिक ग्रंथात दिलेला आहे. ग्रंथांच्या सहवासातमध्ये अनेक नामवंतांनी आपल्या वाचन प्रवासाचे आनंददायी वर्णन केले आहे ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. या तिन्ही पुस्तकांनी मराठी साहित्यात अत्यंत मोलाची भर घातली आहे म्हणून प्रत्येक मराठी माणसाने ही तिन्ही पुस्तके

*दुबळी माणसे कधी क्षमाशील नसतात, क्षमा करणे हे बलवानांचे बलस्थान आहे.*

वाचलीच पाहिजेत अशी शिफारस करतो.

-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-

## आंग्ल वाङ्मयातील

**कल्पना विलास, वास्तव, स्त्री आणि चित्रपट सृष्टी यांचा मागोवा रा. त्र्यं. जोशी यांचे सुंदर पुस्तक :**

भले मोठे शीर्षक असलेल्या या सुंदर पुस्तकाचे लेखन रा. त्र्यं. जोशी यांनी केलेले आहे (पृ. ११४, मूल्य रु. ८०/- प्र. आ. ऑगस्ट २००७. प्रका. टॉप पब्लिकेशन्स, डोंबिवली - पूर्व, जि. ठाणे)

'जीवनावर' नितांत प्रेम करणारा आशावादी कवी रॉबर्ट ब्राउनिंग, 'शेक्सपिअरची स्वदेश प्रीती', 'थॉमस हार्डी व त्याच्या निराश नायक/नायिका', 'थॉमस हार्डीची काव्यसंपदा इ. एकूण १८ छोटी छोटी प्रकरणे या पुस्तकात आहेत. 'मनोगता'त लेखक म्हणतो, "स्वच्छंदतावादी कवींपैकी, शेले किट्स, रॉबर्ट ब्राऊनिंग बायरन, लोकप्रिय कादंबरीकार थॉमस हार्डी, चार्लस, डिकन्स आणि नाटककार शेक्सपिअर, कोशकार सॅम्युअल जॉन्सन यांच्या अक्षरवाङमयात मोडणाऱ्या साहित्य कृतीचा धावता आढावा घेतलेला आहे. रॉबर्ट ब्राऊनिंग, शेले, किट्स, बायरन या कवींनी इंग्रजी भाषा वाङ्मय समृद्ध केले आहे. त्यांच्या चरित्रविषयक माहिती बरोबरच जीवन विषयक दृष्टिकोनावर प्रकाश टाकण्यात आला आहे. तसेच हार्डीच्या काव्यसंपदेचा परामर्श स्वतंत्रपणे घेतलेला आहे. इंग्रजी वाङ्मय समृद्ध करणारा श्रेष्ठ लोकप्रिय कादंबरीकार चार्लस डिकन्स यांच्या चढ उतारांचा उल्लेख करतांना त्याची व्यक्तिचित्रे कादंबरीतील अमर पात्रे यांचाही धावता आढावा घेतला आहे."

"सॅम्युअल जॉन्सन हा पत्रकार कोशकार, समीक्षक म्हणून इंग्रजी वाङ्मयात मान्यता पावलेला आहे. शब्दकोशाबरोबरच जॉन्सनच्या शेक्सपिअरच्या नाटकावरील समीक्षा आणि कवी चरित्रमाला संस्मरणीय ठरलेल्या आहेत. आजच्या पिढीला तो कोशकार एवढाच ओळख आहे. १९३५ ते १९५० हा काळ इंग्रजी चित्रपटाच्या दृष्टीने अत्यंत वैभवशाली व भरभराटीचा होता. त्यामध्ये इतिहास निर्माण करणाऱ्या चित्रपट कंपन्या, गाजलेल्या चित्रपटांचे दिग्दर्शक, नायक-नायिका यांच्या योगदानाचा परिचय या पुस्तकात करून दिलेला आहे."

या पुस्तकातील विविध प्रकरणांतून दिलेल्या मनोरंजक माहितीमुळे पुस्तक वाचनीय झाले आहे. इंग्रजी भाषा आणि इंग्रजी चित्रपट यांनी साऱ्या जगतावर मोहिनी का घातली आहे हे पुस्तक वाचल्यावर कळते. लेखक व प्रकाशकाचे अभिनंदन.

**टॉप पब्लिकेशन्सची इतर दर्जेदार प्रकाशने :**

- तारखेत काय आहे? (दिन विशेषांचा नवा कोरा संदर्भ प्रकार)
- पावली जी पावली (गुणवंत कामगाराचे उद्बोधक आत्मचरित्र)
- व्यक्तिमत्त्व विकास (इयत्ता ९ वी व १० वी च्या अभ्यास क्रमात सार तयार केलेली पुस्तके + जादूचे चौरस - गणितातील (गणित प्रेमींसाठी) + ह्रस्व की दीर्घ (शुद्ध शब्दांचा संग्रह)

-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-·-

**अध्यात्म विषयाला वाहिलेले 'धर्मयज्ञ' मासिक :**

या छोट्या पण दर्जेदार मासिकाने एप्रिल २००९ मध्ये चौथ्या वर्षात् पदार्पण केले आहे. गीता फाऊंडेशन ('चैतन्य', लोकमान्य सोसायटी, पंढरपूर रोड, मिरज - ४१६४१०; फोन नं. ०२३३-२२३२०८२; वा.व. रु. २५०/-; वर्गणी गीता फाऊंडेशनच्या नावे मिरज/सांगलीवरील ड्राफ्टने किंवा म. ऑ. पाठवावी) च्या तर्फे

---

*अंधश्रद्धा प्रत्येकच समाजात असते.*

प्रसिद्ध केले जाते. संपादक आहेत सौ. जयश्री दिलीप आपटे सहाय्यक श्री. दिलीप वासुदेव आपटे.

मासिकाच्या तिसऱ्या वर्षाच्या बाराव्या अंकातील 'संपादकीय मनोगता' त संपादक म्हणतात, ''सध्याच्या अनैतिकतेच्या व अत्यंत प्रदूषित समाजमनाच्या अवस्थेत राहून सुद्धा त्यापासून अलिप्त कसे रहावे व हे ध्येय साध्य कसे करावे याचे सखोल, संपूर्ण व उत्तम मार्गदर्शन करणे हे काम आपले अध्यात्मिक ग्रंथ प्रेमपूर्वक करतात. त्यादृष्टीने गीता-भागवत-रामायण-ब्रह्मसूत्रे-ज्ञानेश्वरी-उपनिषदे-गुरुचरित्र यांवरील लेखमाला धर्मयज्ञद्वारे सुरु आहेत. याला वाचकांचा प्रतिसाद आहे व हीच 'धर्मयज्ञ'ला मिळत असलेली प्रेरणा व भगवंताचा आशीर्वाद होय.''

'यतन्तश्च दृढव्रता' भगवद्प्राप्तीसाठी दृढनिश्चयाने सतत प्रयत्नशील राहणे हे या मासिकाचे बोधवाक्य आहे. हे मासिक करमणुकीसाठी नाही म्हणून त्यात 'अध्यात्म' विषयाखेरीज अन्य प्रकारचे लेखन नसते. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची जाहिरात नसते. 'अध्यात्मज्ञान नित्यत्वम्' रहाणे हाच मासिकाचा उद्देश आहे. ('गीता फाऊंडेशनचा दर तिमाहीचा जमा खर्च सर्वांना दर्शविला जातो हे या माविकाचे वैशिष्ट्य आहे. अत्यंत काटकसरीने खर्च करून शक्य होईल तेवढा वाचवलेला शिल्लक खर्च पैसा शिक्षणासाठी ''शिष्यवृत्ती' म्हणून वापरण्याचा संस्थेचा प्रयत्न असतो.) पत्रद्वारे जपानी भाषा शिकविण्याची योजना कार्यान्वित आहे. गीता प्रसाराचे कार्य सातत्याने सुरू असते. नुकतेच शृंगेरीला ९ गीता प्रेमी शंकराचार्यांचे मठात जाऊन आचार्यांकडून बक्षीस घेऊन आले. मागील ६ महिन्यात सुमारे ६०० शाळकरी मुलांना गीता अध्याय पाठांतराबद्दल सुमारे ७०,००० रु. ची बक्षिसे शृंगेरीच्या शारदापीठातर्फे दिली गेली. 'धर्मयज्ञ' वाचकांपैकी किंवा त्यांच्या परिचितांमध्ये कोणालाही जर गीतेचा १ ते १८ अध्याय किंवा १ ते ६ अध्याय पाठ येत असतील तर त्यांनी गीता फाऊंडेशनशी ९८६००३२०८२ या क्रमांकावर संपर्क साधावा. संस्थेच्या मौलिक कार्याबद्दल अभिनंदन व मासिकास शुभेच्छा. वाचकांनी या मासिकासाठी वर्गणीदार व देणगी रूपाने उदंड प्रतिसाद द्यावा ही नम्र विनंती.

---

## 'शंकर दिग्विजय' ग्रंथराज प्रसिद्ध होणार!

विद्यारण्य स्वामींनी लिहिलेला हा एक अपूर्व ग्रंथ आहे. शंकराचार्यांचे जीवन व कार्य समजून घेण्यासाठी या ग्रंथाएवढा दुसरा अधिकृत ग्रंथ नाही. सोळा सर्गात हा ग्रंथ असून याची श्लोक संख्या १८४३ आहे. भाषा अत्यंत भारदस्त, साहित्यिक गुणांनी नटलेली संस्कृत आहे. या ग्रंथाचे मराठी सुबोध व सुंदर भाषांतर ज्योतिषालंकार श्री. ज. गो. मराठे यांनी केले आहे. मराठीत हा ग्रंथ प्रथमच प्रकाशित होत आहे. ग्रंथाच्या प्रति मर्यादित असल्याने किंमत थोडी जास्त (रु. ७००/-) ठेवावी लागत आहे. पण जून २००९ अखेर पर्यंत फक्त २५०/- रु. देऊन प्रकाशनपूर्व नांव नोंदणी करणाऱ्यांना हा ग्रंथ बाकीची रकम भरल्यावर घरपोच मिळणार आहे. ही मुदतपूर्व सवलत बुधवार दि. २९-४-०९ रोजी शंकराचार्य जयंती पासून सुरू झालेली आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क पत्ता शेवटी दिला आहे.

वैशाख शुद्ध पंचमी शके १९३१, बुधवार २९ एप्रिल २००९ रोजी शंकराचार्यांची जयंती होती. त्यादिवशी संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम रिद्धी सिद्धी अपार्टमेंटमध्ये श्री. गुणेश मराठे यांच्या घरी साजरा झाला. त्यात आचार्यांच्या स्तोत्रांच्या ध्वनीफिती, पुस्तकांचे प्रदर्शन, त्यांचे जीवन व कार्य यांची माहिती देणारे, एका अभ्यासू आचार्य भक्ताचे व्याख्यान हे कार्यक्रम झाले.

याच मुहुर्तावर श्री. ज. गो. मराठे यांच्या 'शंकर दिग्विजय' या ग्रंथाचे मराठी भाषांतर (या पुस्तकासाठी केलेले) सवलत मूल्यांतील नाव नोंदणी केली जाणार आहे.

---

*आईसारखे दैवत साऱ्या जगतात नाही.*

मराठीत पहिल्यांदाच हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे. ते १५ ऑगस्ट २००९ पर्यंत हातात पडेल. साधारण ७००/- रु. किमतीचे हे पुस्तक असून, २५०/- रु. भरून नांव नोंदणी करणाऱ्यांना बाकीची रक्कम भरल्यावर पुस्तक घरपोच मिळणार आहे.

यासाठी शुल्क पाठविण्यासाठी किंवा फक्त नाव, पत्ता पत्राने कळवण्यासाठी पत्ता असा आहे. (आपले शुल्क म. ऑ. चेक अगर डीडीने पाठवावे. आगार) -

**'सानिक प्रकाशन'**
**गुणेश मराठे**
३०४, ॐ रिद्धी सिद्धी अपार्टमेंट,
पद्मण नगर, आगाशी,
ता. वसई, जि. ठाणे - ४०१३०१.

## विविध विषयांवरील माहितीचा खजिना असलेला संग्राहय संख्या-संकेत कोश (श्रीधर शामराव हणमंते)

**कोशवाङ्मय :**

'व्याकरण विपुलता व कोशसंपन्नता हे भाषेच्या प्रतिष्ठेचे आधारस्तंभ व तिच्या भावी प्रगतीचे मार्गदर्शक दीपस्तंभ होत. व्याकरण व कोश ही भाषा अधिकाधिक सुसंस्कृत व प्रौढ आणि व्यापक विचारवाहनक्षम करण्याची महत्त्वाची साधने आहेत असे विचार प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या (१९५८) प्रस्तावनेत आहेत.

के. मा. श्री. अणे याच प्रस्तावनेत पुढे म्हणतात, 'कोश निर्मितीचे किंवा व्याकरण रचनेचे कार्य हे जितके महत्त्वाचे तितकेच बिकट व दीर्घोद्योग आणि दृढ व्यासंगाचे आहे. काही विशिष्ट हेतू मनात धरून कोशरचनेस जो बसतो, त्याला वाङ्मय महानिधीचे मंथन करून आपली रत्ने मिळवून ती एकत्र करावी लागतात. म्हणून कोश रचनेसारखी कार्ये एकट्या दुकट्याच्या हातून होणे फार कठीण असते. मराठीत हे कार्य श्रीछत्रपती शिवाजी महाराजांच्या 'राज्यव्यवहार कोश' रचनेपासून सुरू झाले, असे म्हणावयास हरकत नाही. मोल्सवर्थ व कँडी इत्यादिकांच्या नावाने प्रसिद्ध असलेले मराठीचे भाषेचे कोश हे प्रथमतः मुख्यत्वे करून इंग्रजांना आमच्या भाषेचा अभ्यास करण्यासाठीच लिहिले गेले होते, म्हणून इंग्रजी-मराठी व मराठी इंग्रजी अशा द्विभाषिक रूपात ते प्रसिद्ध करण्यात आले होत, असे मला वाटते.''

''कोश हे ज्ञानाचे साधन आहे, हे ठरल्यावर कोणत्या विषयाचे ज्ञान आहे त्या विषयावर कोश रचना देण्याचाही पायंडा मराठीत पडायला लागला. माझे दिवंगत मित्र डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी मराठी ज्ञानकोश हा प्रचंड ग्रंथ प्रसिद्ध करून मराठी भाषेस मान मिळवून दिला. कोणी जर मराठी वाङ्मयाचा विभूति कोश लिहावला लागलं, तर त्याला कोशकर्त्यांत 'श्रीधर कोश कारेषु' असे वाक्य घालून त्यांच्या महत्कृत्याबद्दलचा आपला आदर व्यक्त करणे भाग पडेल.''

सुप्रसिद्ध कोशकार डॉ. सदशिव गजानन देव यांनी त्यांच्या 'कोशवाङ्मय : विचार आणि व्यवहार' या श्रेष्ठ दर्जाच्या ग्रंथात पृ. ३१० वर म्हटले आहे की कृष्ण शास्त्री चिपळूणकर यांनी 'अनेक विद्या मूलतत्व संग्रह' कोश १८६१ साली प्रसिद्ध केला. या ग्रंथाची पृष्ठ संख्या ५+३०२ एवढी आहे. सामान्यज्ञान, पदार्थ विज्ञानशास्त्र, वाक्यालंकार, चरित्रे अशी उपयुक्त माहितीचा ग्रंथात संकलित करण्यात आलेली आहे.''

**संख्या-संकेत कोश :**

या ग्रंथाची द्वितीय व तृतीय आवृत्ती अनुक्रमे १९६४ व १९८० साली प्रसिद्ध झाली. चौथी आवृत्ती १४-२-२००४ साली प्रसिद्ध झाली. (पृ. ५७३, मूल्य रु. २५०/-)

प्रसाद प्रकाशनानेच (१८९२, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०, फोन नं. :०२०-२४४७१३३७) या सगळ्या 'आवृत्त्या प्रसिद्ध' करून कोश वाङ्मयात अत्यंत मोलाची भर घातलेली आहे. हा कोश अनेक वर्षे दुर्मीळ होता. तो २००४ साली प्रसिद्ध करून प्रसाद प्रकाशनाच्या मनोहर पंत जोशी यांनी अभ्यासकांची मोठी सोय केलेली आहे.

कोश वाङ्मयातील संख्या-संकेत कोश हा वेगळाच प्रकार आहे. संख्या किंवा विविध संकेत हे भाषेच्या ज्ञानाच्या अभिव्यक्तीत किती महत्वाचे आहेत हे माहिती असले तरी हा कोश नुसता जरी चाळला तरी त्याचा भारतीय संस्कृतीशी असलेला मनोरंजन संदर्भ सहजगत्या मिळून जातो. गणिती संख्यांचे हे मनोरंजक वाचन वाचणाऱ्याला नक्कीच समृद्ध करते.

या ग्रंथात शून्यापासून १०८ संख्येपर्यंतचे, प्रत्येक संख्येचे विषय देण्यात आलेले आहेत (काही संख्यांचे विशेष न आढळल्यामुळे त्या संख्या दिलेल्या नाहीत) विशेष म्हणजे १०८ पर्यंतच्या संख्यांची भरपूर माहिती लेखकाने संकलित केल्यामुळे प्रस्तुत ग्रंथाची ५६६ पाने व्यापलेली आहेत. नंतर एकसहस्र, पंचसहस्र, दशसहस्र, परिशिष्ट १, परिशिष्ट २ व परिशिष्ट ३ यांची माहिती उरलेल्या सात पानांत दिलेली आहे.

पंचप्राण कोणते? सप्तधातू कोणते? नाटकाची सहा अंगे कोणती? छत्तीस यक्षिणी कोणत्या? काळ्या बाजाराचे ४० प्रकार कोणते? छप्पन्न भाषा कोणत्या, व्याण्णव मूलतत्वे कोणती? इ. विविध विषयांतील माहिती संख्या-संकेत कोशात एकत्रितपणे वाचावयास मिळेल. ग्रंथकर्त्याने साडेतीनशेच्यावर विविध विषयांवरील ग्रंथांचे संदर्भ घेऊन पाच हजाराचे वर संकेतांची माहिती या ग्रंथात एकत्रित करण्याची प्रचंड कामगिरी केलेली आहे. वेद, उपनिषदे, धर्मशास्त्र, भक्तिशास्त्र, पुराणे, योगशास्त्र, वाचकशास्त्र, विविध कोश असा, असंख्य विषयांवरील ग्रंथांचा अभ्यास करून त्यातील 'संकेत - नवनीत' वाचकांचे हाती के. श्रीधर शामराव हणमंते यांनी दिले आहे. विषयांच्या वैविध्यामुळे केवळ संदर्भ असे त्याचे स्वरूप न राहता रोचक माहितीने परिपूर्ण असे त्याचे स्वरूप झाले आहे. अत्यंत मौलिक माहिती मोठ्या कष्टाने एकत्रित केल्याबद्दल के. हणमंते यांना अभिवादन व प्रकाशक मनोहरपंत जोशी (प्रसाद प्रकाशन) यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

प्रत्येक ग्रंथालयाने हा अमोल ग्रंथ आपल्या ग्रंथालयासाठी घ्यावाच. वाचकांनी सुद्धा हा ग्रंथ आपल्या संग्रही अवश्य ठेवावा अशी शिफारस करावीशी वाटते.

जाता - जाता, या ग्रंथातील एक दोन संख्याविषयीची मनोरंजक माहिती देण्याचा मोह आवरता येत नाही. छत्तीस - छत्तीसचा आकडा - यातील तीन व सहा अंकांच्या आकृती एकमेकांकडे पाठ करून बसलेल्या माणसाप्रमाणे दिसतात. दांपत्यात एकाचे तोंड पूर्वेकडे व दुसऱ्याचे पश्चिमेकडे अशा अर्थी प्रेमाचा अभाव असा अर्थ सुचविला जातो. छत्तीस आयुधे, छत्तीस गणमेलन, छत्तीस गुण गायनाचे, छत्तीस गुण राज्यशासकास आवश्यक, छत्तीस गुणवाचकनावे परमेश्वराची (सर्व धर्म समन्वयात्मक), छत्तीस गुण स्त्रीचे (अरबांचे मते), छत्तीस गुणमेलन (व्यावहारिक दृष्ट्या), छत्तीस तत्वे (शैवसिद्धान्त), छत्तीस तत्वांचे शरीर, छत्तीस प्रमुख वीर वा सेनापती रावणाचे, छत्तीस प्रकार राजविनोदाचे, छत्तीस यक्षिणी, छत्तीस रागिण्या (संगीत), छत्तीस लक्षणे काव्याची, छत्तीस लक्षणे भक्ताची, छत्तीस वाद्ये (वाद्यात प्रकार चार - १. तंतुवाद्ये, २. वाद्ये, ३. घनवाद्ये आणि ४. सुस्वर वाद्ये. प्रत्येकाचे ९ प्रकार म्हणून एकूण ३६ वाद्ये होत.) छत्तीस वानरप्रमुख (रामायण), छत्तीस व्यंजने, एकशे आठ अंकाचे विशेष, १०८ उपनिषदे, एकशेआठ मणी जपमाळेस (शैवमाला-रुद्राक्ष जपमाला ८४ मण्यांची, वैष्णवांची १०८ मण्यांची असते. इस्लामी जपमाला (तसबीह) ९९ मण्यांची असते.

---

*जो द्रव्य वाढवतो, तो काळजी वाढवतो.*

अल्लाची ९९ नावे आहेत असे त्यांचे धर्मशास्त्र सांगते. रोमन कॅथॉलिकांच्या जपमालेत १५० मणी असतात.), एकशे आठ स्थाने या वस्तू मंगलप्रद.

**संख्यावाचक कोश :**

षट्शास्त्रातील दुर्बोध शब्दार्थाचा 'संख्यावाचक कोश' या नावाचा एक पॉकेटसाईजची २२३ पाने असलेला (मूल्य रु. ४०/-) कोश (संपादक रखमाजी देवाजी) अनमोल प्रकाशनाच्या मो. द. नांदुरकर (६८३, बुधवार पेठ, पुणे - ४११००२) यांनी एप्रिल २००१ मध्ये प्रसिद्ध केलेला आहे. यातही शून्य ते ११० पर्यंतच्या अंकाची विशेष माहिती दिलेली (या कोशातही काही संख्यांचे विषय लेखकाला आढळले नाहीत.) या कोशातील १०८ अंकाचे विषय असे -

१) अष्टोत्तरशे महादशेची प्रमाण वर्षे (ज्योतिष) २ अष्टोत्तर माळेचे प्रमाण व १०८ रामायणे. या कोशाची रचना करण्यास लेखकाने महान महान साधूंचे ग्रंथ, पुराणे, शास्त्र असे सुमारे १४० ग्रंथांमधील शब्दार्थाची रत्ने शोधून काढली आहेत. या कोशाविषयी रत्नाकर नामक एका महान साधूचा अभिप्राय असा आहे -

तैसे ज्ञान श्रद्धेंकरून। या लागी श्रद्धा जीवीं धरून॥

ते श्रद्धा नोहे अप्रमाण। आवडी ज्ञान साधिजे॥

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**

५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## थोडक्यात पण महत्वाचे

पुराणात ग्रंथ एकूण अठरा, सगुण अवतारांच्या महात्म्याबरोबर पुराणे वाढली विष्णुचे दहा अवतार कथा, शिवाच्या लीलांचा प्रभाव पुराणांनी लोकप्रिय केल्या. त्यांची नावे अशी १ ब्रह्म, २. पद्म, ३. विष्णु, ४. शिव, ५. भागवत, ६. नारद, ७. मार्कंडेय, ८. अग्नि, ९.भविष्य, १०. ब्रम्हवैवर्त, २११. लिंग, १२. वराह, १३. स्कंद, १४. वामन, १५. कूर्म, १६. मत्स्य, १७. गरूड, १८. ब्रम्हाण्ड. पुराण श्रवण रावापासून रंकापर्यंत नित्याच्या धार्मिक विधि म्हणून केले जाते. प्राचीन राजे, वंशावळी, काळगणना, सृष्टी निर्मिती, भगवंताचे विविध अवतार, त्यांचे कार्य, प्रलय, भूगोल, खगोल, यांचे विस्तृत वर्णन पुराणातून आले आहे.

भारतीय धर्म, संस्कृती, मोक्ष साधन, यांच्या विकासाच पुराणाचे मोठे साहाय झाले. सकाम व्रते ऐहिक अभिवृद्धीची लालसा पुराणमुळे झाली, अवैदिकांच्या लाटेखाली हिंदुधर्म खिळखिळा होण्यापासून पुराणामुळे वाचला. वेदांतील विचार, कर्म, उपासना, इत्यादी लोकाभिमुख केली. उपनिषदातील सत्य ज्ञान अनंत परब्रम्ह पुराणातून सगुण सालंकृत पतितपावन अशा रूपात उभे राहिले. वर्ण-बाह्यांना पुराणा नी भक्तिच्या साधनेत आणले, पुराणांनी - प्रवृत्ती, निवृत्ती, यती, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, स्त्री, शुद्र, संकर जाती व त्रैवर्णिक या सर्वांना उपयुक्त धर्म सांगितले.

# परिसरवार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

**'दिशा' गौरवक्षण :**

**+ विज्ञान दिन -**

दि. २८ फेब्रु. ०९ रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिना' निमित्त विज्ञान विषयक घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली. यातील विशेष घोषवाक्ये निवडण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| इ. ५ वी | ठाकूर अभिषेक | (५ ब) | प्रथम क्रमांक |
| | रासम मालविका | (५ क) | द्वितीय क्रमांक |
| इ. ७ वी | हळदणकर ओजस | (७ अ) | प्रथम क्रमांक |
| इ. ८ वी | मालणकर मृदुला | (८ अ) | द्वितीय क्रमांक |
| इ. ९ वी | प्रियांका गुरव | (९ अ) | प्रथम क्रमांक |
| | गोठल धनश्री | (९ ब) | द्वितीय क्रमांक |
| | पाटील संजिवनी | (९ अ) | तृतीय क्रमांक |

**विज्ञान - व्यंगचित्र स्पर्धा :**

| | | | |
|---|---|---|---|
| इ. ५ वी | कोलगे दर्शना | (५ ड) | प्रथम क्रमांक |
| | कोळी आदर्श | (५ इ) | द्वितीय क्रमांक |
| | धाकोरकर दुर्गा | (५ ड) | तृतीय क्रमांक |
| इ. ६ वी | पवार अनिकेत | (६ इ) | प्रथम क्रमांक |
| | शिंदे सिद्धेश | (६ ड) | द्वितीय क्रमांक |
| | मदने विशाखा | (६ ड) | तृतीय क्रमांक |

विज्ञान शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत सात शिक्षकांनी भाग घेतला होता.

प्रथम क्रमांक - मान. मुख्याध्यापिका सौ. कळमकर
(विषय - प्राचीन भारतीय खगोल विद्या)

द्वितीय क्रमांक - सौ. वंदना अडसुळे
(विषय - Dr. Vikram Sarabhai : The father of Indian space programme)

**+ जागतिक मराठी दिन :**

दि. २७ फेब्रु. ०९ 'जागतिक मराठी दिना' निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

**इ. ५ वी ६ वी - १५ मिनिटात जास्तीत जास्त म्हणी लिहिणे**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | कानोलकर ऋचा (५ ब) |
| | | पाटील स्नेहल (६ ड) |
| द्वितीय क्रमांक | - | आहिरे उत्तरा (५ ब) |
| | | पाटील तेजस (६ इ) |

**इ. ७ वी ८ वी - कुसुमाग्रजांची कविता पाठ करून लिहिणे**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | झाडकर मुग्धा (७ इ) |
| | | चंद्रराव ऋतुजा (८ अ) |
| द्वितीय क्रमांक | - | गावकर शिवानी (७ ब) |
| | | सावंत ओमकार (८ अ) |
| तृतीय क्रमांक | - | हळदणकर ओजस (७ अ) |
| (विभागून) | | बागडे सेजल (७ क) |

(विभागून) आनेकर सरस्वती (८ ब)

पोतदार स्नेहल (८ इ)

**इ. ९ वी - उतारा पाठांतर**

प्रथम क्रमांक - पाटील संजिवनी(९ अ)

गुरव प्रियांका (९अ)

## + जागतिक जलदिन :

२२ मार्च 'जागतिक जलदिना' निमित्त मा. श्री. मंगेश गुप्ते हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन लिमिटेडचे जनरल मॅनेजर यांचे दृकश्राव्य माध्यमाद्वारे उत्तम व्याख्यान झाले. व्याख्यानाचे स्वरूप प्रश्नोत्तर माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पाण्याविषयीची जागृती निर्माण करणे असे होते. 'पाणी' एक अत्यंत महत्वाचे नैसर्गिक संसाधन आहे. त्याचा दुरुपयोग टाळावा आणि पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी स्वत:पासूनच पाण्याचा काटकसरीने वापर सुरू करण्याची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतली. इ. ५ वी अ, ब, क चे वर्ग यात सहभागी होते.

## + ग्रंथाली वाचक दिनसोहळा :

दि. २१ फेब्रु. ०९ रोजी धिराणी विद्यालय, ठाणे येथे 'ग्रंथाली वाचक दिनसोहळा' साजरा झाला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी एका व्यक्तीची प्रत्यक्ष मुलाखत घेण्याची स्पर्धा घेण्यात आली. इ. ८ अ मधील आदिती म्हात्रे, अनुजा घावटे, प्रज्ञा पंडित, प्राची देवरे, दक्षता सावंत, आदिती चोभे या विद्यार्थिनींनी सामाजिक कार्यकर्ते श्री. सचिन श्रीकांत गोगटे यांची मुलाखत घेतली. 'ग्रंथाली' तर्फे त्यांना पुस्तक भेट म्हणून मिळाले.

## + बाह्य स्पर्धा :

'सकाळ' वृत्तपत्रातर्फे घेण्यात आलेल्या 'ग्रेट आर्टिस्ट' स्पर्धेत मुळ्ये ओंकार (६ अ), सुर्वे विपुल (६ ड), यादव श्यामल (५ इ) या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. पारितोषिकाचे स्वरूप उत्तम स्कूलबॅग असे आहे.

+ शिवोहम इन्फोटेक संस्थेतर्फे आयोजित भेटकार्ड स्पर्धेत शर्मा नम्रता (९ वी), माने आकांक्षा (७ वी) या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. तसेच शिक्षक / मुख्याध्यापकांसाठी आयोजित निबंध स्पर्धेत मा. मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांना बक्षिस मिळाले.

## + हिंदी बालवाणी परीक्षा (इ. ५ वी) :

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे (मुंबई विभाग) या केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या 'हिंदी बालवाणी' परीक्षेचा निकाल पुढील प्रमाणे -

परीक्षेस एकूण २८० विद्यार्थी बसले होते. विशेष योग्यता श्रेणी १२० विद्यार्थ्यांना मिळाली.

शाळेतून प्रथम क्रमांक - सुतार ऋतुराज (५ अ)

पाटील संदीप (५ड)

खानोलकर ऋचा (५ ब)

कदम वैष्णवी (५ ब)

निकाल ९९% लागला.

## + मराठी चौथी परीक्षा :

'मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ' तर्फे जाने' ०९ मध्ये इ. ६ वी साठी मराठी चौथी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेस ४३ विद्यार्थी बसले होते. निकाल १००% लागला असून काळभोर प्रणिता हि विद्यार्थिनी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

विशेष प्रावीण्य ७ विद्यार्थी

प्रथम श्रेणी २९ विद्यार्थी

---

*नियमांना अपवाद असतात, अपवादांचे नियम होऊ नयेत.*

द्वितीय श्रेणी ६ विद्यार्थी

तृतीय श्रेणी १ विद्यार्थी

✦ **कात्रण स्पर्धा :**

'लोकमत' वृत्तपत्रातर्फे आयोजित 'संस्काराचे मोती' ०८ या कात्रण स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि. ५ मार्च रोजी संपन्न झाला. या समारंभासाठी प्रमुख अतिथी मान. खासदार डॉ. संजीवजी नाईक, मान. श्री. शिरीष बंगाळे (शाखा व्यवस्थापक लोकमत) हे उपस्थित होते. समारंभात विद्यार्थ्यांनी जीवनात ध्येय बाळगावे ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न, जिद्द यांची जोड द्यावी असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. श्री. नाईक यांनी इ. ६ वी ते ८ वी च्या ९०० विद्यार्थ्यांना कालदर्शिका देण्यात आल्या तसेच खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

पाटील नेहा (इ. ७ वी) - प्रथम क्रमांक

काते अनिकेत (इ. ८ वी) - द्वितीय क्रमांक

मोरे विशाल (इ. ७ वी) - तृतीय क्रमांक

२१ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक, १५ विद्यार्थ्यांना सहभागाची प्रशस्तिपत्रके प्राप्त झाली. तसेच लोकमत 'भव्य चित्रकला' स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

✦ २७ मार्च रोजी ठाणे शहरातील 'कौपिनेश्वर न्यास' या संस्थेतर्फे होणाऱ्या शोभायात्रेत आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी 'बोर्ड' तयार करण्याचे काम स्वत: पूर्ण केले. पूर्ण यात्रेमध्ये 'दासबोध' मंडळाच्या सदस्यांना मदत केली.

✦ बालक मंदिर संस्था कल्याण तर्फे कै. इंदूताई देवधर व कै. वा. शि. आपटे स्मृती प्रित्यर्थ घेण्यात आलेल्या ठाणे जिल्हा स्तरीय निबंध स्पर्धेत मा. मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांच्या निबंधाला उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

**सुवर्णमहोत्सवाचे उद्घाटन :**

माध्यमिक विभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे होत आहे. सोमवार दि. १५ जून २००९ हा शाळेचा सुवर्णमहोत्सवी वर्षातील पहिला दिवस विद्यार्थ्यांनी तयार केलेली तोरणे लावून प्रत्येक वर्गापुढे रांगोळ्या काढून सनईच्या मंजुळ स्वरात प्रत्येक मुलाला चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत केले.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि मंडळाचे सचिव उत्तम जोशी, ज्येष्ठ सभासद श्री. करंदीकर, श्री. मा. ना. पाटील व दिलीप जोशी हे या समारंभास उपस्थित होते.

सर्व शिक्षकांनी उत्तम विद्यार्थी या स्पर्धात्मक युगासाठी तयार करावेत आणि शाळा व संस्थेचे नाव उज्ज्वल करावे तसेच शिक्षकांनी नव्या ज्ञानाच्या व्याप्तीला सामोरे जावे, असे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सांगितले. करंदीकर सरांनी शिक्षकांनी सर्व उपक्रमात मनापासून सहभागी व्हावे तसेच मा. ना. पाटील यांनी सुवर्णमहोत्सवी वर्षाचे विशेष महत्त्व सांगितले. उत्तम जोशी यांनी शिक्षकांनी सक्षमता वाढवावी आणि आपले विद्यार्थी सर्व क्षेत्रात झळकतील असे पहावे असे सांगितले.

सौ. अल्पना बापट व दिलीप जोशी यांनी आम्ही याच शाळेचे माजी विद्यार्थी आहोत आणि आपल्या शाळेच्या ५० व्या वाढदिवसाला हजर आहोत याचा आनंद व्यक्त केला. सौ. ए. के. जोशी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर, मराठी पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. वैद्य, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. भंडारे यांनी जातीने उपस्थित राहून या समारंभास आपल्या शुभेच्छा दिल्या. या सुवर्णमहोत्सवानिमित्त इ. ५ वी अ, ब, क व ८ वी अ, ब च्या विद्यार्थ्यांसाठी जीवनविज्ञान अकादमी, मुंबई यांच्यातर्फे जीवन विज्ञान शिक्षण विद्यार्थ्यांना आरोग्य संपन्नता,

स्मरणशक्ती वाढविणे, क्रोधावर नियंत्रण, उठणे - बसण्याची शास्त्रीय पद्धती यांचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकांसह दिले. यासाठी आलोक भट्टाचार्य, मधु कच्छार, विनोद संघवी, प्राचार्य सुरेंद्र वाजपेयी आणि जीवन विज्ञान संस्थेचे अध्यक्ष धालीलालजी तातेड उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा कंटाळा, आळस कसा दूर करावयाचा याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांनी अतिशय आनंददायी ठरले. सर्व कार्यक्रमांचे आयोजन मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी केले.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)

२००८ - २००९ च्या बालवीर व वीरबाला राज्य पुरस्काराचा निकाल १००%

**बालवीर राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे :**

१. पुष्कर मेहता
२. मिहीर माईनकर
३. वैभव देवघरे
४. अक्षय सोनिग्रा
५. सुबोध मांजरेकर
६. चिराग शाह
७. रमेश बिसारिया
८. तन्मय खामकर
९. सुनित म्हात्रे
१०. करण कांकरिया
११. अंकिश वर्धावत

**वीरबाला राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे :**

१. रिया दाते
२. प्राची जैस्वाल
३. अक्षता मोहरीर
४. सानिका ओक
५. तन्वी राणे
६. तन्मयी धमाले
७. मधुरा गोडबोले
८. स्निग्धा मधुरे
९. हेतल पागधर
१०. प्रज्ञा प्रसादे

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

**vpm thane.blogspot.com. :**

चालू घडामोडींवर तसेच एखाद्या अद्ययावत किंवा ताज्या घटनेवर विविध विषयतज्ज्ञ, BRIMS चे प्राध्यापक, व्याख्याते व विद्यार्थी वर्ग यांच्यामध्ये संवाद घडवून आणण्यासाठी तसेच त्या त्या घटनांबद्दलची विषयतज्ज्ञांची मते सर्वांना कळावीत, या उद्देशाने vpmthane.blogspot.com. हा ब्लॉग तयार करण्यात आला आहे.

या ब्लॉगवर चालू घडामोडींवर आधारित एखादा लेख प्रसिद्ध केला जातो. या लेखाबद्दलची आपली मते वाचकांना या ब्लॉगवर लगेचच नोंदवता येतात. तसेच विद्यार्थी किंवा वाचक लेखा संदर्भात, त्यांच्या शंका किंवा प्रश्न देखील विषय तज्ज्ञांना विचारू शकतात. तसेच शिक्षकांना/प्राध्यापकांना देखील एखाद्या विषयावरील आपला लेख या ब्लॉगवर प्रसिद्ध करावयाचा असल्यास ते drvnbrimslibrary@gmail.com या इ-मेल आयडी वर पाठवू शकतात. अशाप्रकारे विद्यार्थी व शिक्षकांनी चालू घडामोडीबद्दल अधिकाधिक माहिती मिळावी. त्या त्या विषयावरील माहितीची विचारांशी देवाण-घेवाण व्हावी या उद्देशानेच हा ब्लॉग तयार करण्यात आला आहे तरी वि. प्र. म. च्या संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्याचा अधिकाधिक लाभ घ्यावा.

**श्री. संदीप भावसार,** ग्रंथपाल
Dr. VN BRIMS Library

•••

मुखपृष्ठावरून

संपादकीय

**बोधप्रद अहवाल**

वर वर्णन केलेल्या 'समृद्ध' समाजात स्वातंत्र्याच्या अतिरेकी संकल्पना जन्म घेऊ लागतात. यातूनच पराकोटीच्या 'मानवी अधिकारां'ची संकल्पना निर्माण होते. जुन्या सामाजिक, आवश्यक नियमांच्या चौकटींच्या मोडतोडीला 'सुधारणे'च्या नावाखाली सुरूवात होते. सुरेल संगीत जाऊन कर्कश संगीत, वेडेवाकडे अश्लील हावभाव करणाऱ्या नाटकांना मान्यताच नाही तर विशेष पुरस्कार मिळू लागतात. केसा पासून वेशा पर्यंत सर्वच विचित्र करण्याकडे कलाकारांचा आग्रह दिसतो. अनेक वेळेला अशा कलाकारांना बघणे हा डोळ्यांवर जुलुम असतो.

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही ही भूमिका येथे संपलेली असते. एवढेच नाही तर बेताल, स्वैराचारी, विचित्र, एकांगी वागणे म्हणजे सर्जनशील, नावीन्यपूर्ण असे संकेत प्रस्थापित होऊ लागतात. खरे तर अशी बेताल वागणूक इतकी सोपी असते की अशा गोष्टींचे पीक येते व वैशिष्ट्य सिद्ध करण्यासाठी आणखीन हीनता आणण्याचा प्रयत्न सुरू होतो. सर्व नीती, नियम, समाजसंस्था, सांस्कृतिक साज यांची मोडतोड केल्यावर काय शिल्लक राहते याचा विचार केल्यावर आजची 'पाश्चिमात्य' जीवन असे त्याचे उत्तर येते. धर्मगुरुंच्या बेताल वागण्याचे हे अहवाल व आजच्या आर्थिक मंदीला कारणीभूत झालेल्या अनियंत्रित, स्वार्थी, दिशाहीन आर्थिक संस्थांचे नेतृत्व या ऱ्हासाची अत्यंत महत्त्वाची व चांगली उदाहरणे आहेत.

अमेरिकेपासून युरोपपर्यंतच्या शाळांमधून खालावलेला शैक्षणिक दर्जा याला कारणीभूत आहे. शिक्षक व शैक्षणिक साधनसामग्री याला कारणीभूत नसून आत्मकेंद्रित, स्वैराचारी संस्कृती याला जबाबदार आहे. 'दिशा'च्या या आधीच्या संपादकीयात उल्लेख केल्यानुसार इंग्लंडमध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या अहवालात हे निष्कर्ष स्पष्टपणे मांडण्यात आले आहेत.

यामुळे पाश्चात्यांच्या 'भौतिक' विकासाने दिपून न जाता त्यांच्यात झालेल्या 'मूल्य' ऱ्हासामुळे निर्माण झालेल्या समाजाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. 'नवीन' म्हणजे 'चांगले', 'पाश्चात्त्य' म्हणजे 'आधुनिक', जुन्या 'परंपरा' म्हणजे 'अडवण' ही मानसिकता आमूलाग्र बदलणे आवश्यक आहे. या पाश्चात्त्य देशांत मोठ्या प्रमाणात जो भारतीय समाज स्थलांतरित झाला आहे, त्यांच्या पुढील पिढीने तेथील शिक्षण व इतर क्षेत्रांत मिळवलेले यश विचार करायला उद्युक्त करणारे आहे. अनेक अभ्यासकांनी याचे कारण, त्यांनी टिकवलेली कुटुंबसंस्था व पालकांचा मुलांचे भवितव्य घडवण्यातला सहभाग असल्याचे मान्य केले आहे. ही मूल्ये पाश्चात्त्य मूल्यांच्या विरूद्ध आहेत. म्हणूनच आजची बेजबाबदार, स्वैराचारी, समाजसंस्थांची मोडतोड करण्याऱ्या पाश्चात्त्य मूल्यांची आयात करणाऱ्या भारतीयांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. भारतीय शिक्षण म्हणजे 'वाईट' हा एक उठता बसता घोकण्याचा विषय होऊन बसला आहे. या व्यवस्थेत परीक्षा पद्धती, घोकंपट्टी, गृहपाठ, अभ्यास, पालक शिक्षक बंधन हे सर्व चांगल्या शिक्षणाकरता आवश्यकच आहे. बदल म्हणजे मोडतोड नाही, बदल म्हणजे असलेली व्यवस्था अधिक परिपक्व व संतुलित बनवणे होय. म्हणूनच कमीत कमी अशा अहवालांचा भारतीयांनी अभ्यासकरणे महत्त्वाचेच नाही, तर बोधप्रद आहे.

डॉ. विजय बेडेकर

●●●

*माणुसकीची वाढ म्हणजे सुधारणा होय.*